



दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com


तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25



काजळे ज्वेलर्स
आजचे सोन्याचे भाव
22 कॅरेट हॉलमार्क दागिणे = 1, 46, 900/-
20 कॅरेट मणी = 1, 33, 550/-
18 कॅरेट रोज गोल्ड = 1, 20, 185/-
16 कॅरेट मुरणी = 1, 06, 840/-
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777



वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ५६ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शुक्रवार । ०६/०३/२०२६ । पाने - ६


# आखाती युध्दात आत्तापर्यंत हजारपेक्षा जास्त नागरिकांचा मृत्यू

## इराणचे १७ जहाज उध्वस्त, दोन्ही बाजूच्या हजारो सैनिकांचाही मृत्यू



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

आज अमेरिका-इस्त्रायल-इराण युद्धाचा सहावा दिवस आहे. यासोबतच अमेरिकेने इराणवर हल्ला करून १०० तास उलटले आहेत. आतापर्यंत या युद्धात १,००० हून अधिक लोक मारले गेले आहेत. इस्त्रायल आणि अमेरिकेने मिळून १७ इराणी जहाजे बुडवली.

इराणने मध्यपूर्वेतील नऊ देशांमधील अमेरिकेच्या तळांवर हल्ला करून प्रत्युत्तर दिले. दरम्यान, इस्त्रायलने लेबनॉनमधील त्रिपोली येथील पॅलेस्टिनी निर्वासित छावणीवर हल्ला केला. वृत्तानुसार, हा हल्ला बेद्दावी निर्वासित छावणीत झाला, जी उत्तर लेबनॉनमधील सर्वात मोठी पॅलेस्टिनी निर्वासित छावणी मानली जाते. दरम्यान इराणने इस्त्रायलला कडक इशारा दिला आहे. एका इराणी लष्करी अधिकाऱ्याने सांगितले की जर अमेरिका आणि इस्त्रायलने इराणमध्ये सत्ता बदलण्याचा प्रयत्न केला तर इराण इस्त्रायलच्या दिमोना अणुसुत्राला लक्ष्य करू शकते.

इराणी वृत्तसंस्था आयएसएनए नुसार, अशा कोणत्याही कृती झाल्यास दक्षिण इस्त्रायलमध्ये असलेल्या अणुसुत्रावर हल्ला केला जाऊ शकतो असे अधिकाऱ्याने सांगितले.

अमेरिकेने बुधवारी भारतातून परतणाऱ्या आयआरआयएस देना या इराणी युद्धनौकेवर श्रीलंकेजवळ हल्ला करून ती बुडवली आहे. या हल्ल्यात आतापर्यंत ८७ इराणी नौसैनिक ठार झाले आहेत. ही माहिती श्रीलंकेच्या सरकारने दिली आहे.

अमेरिकेचे संरक्षण मंत्री पीट हेगसेथ यांनी सांगितले की, हिंद महासागरात अमेरिकेच्या पाणबुडीने इराणी जहाजाला टॉर्पेडोने लक्ष्य करून बुडवले. श्रीलंकेच्या नौदलाने ३२ जखमी नौसैनिकांना वाचवून त्यांना रुग्णालयात दाखल केले आहे.

**इराण म्हणाला – इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची म्हणाले की, अमेरिकेने इराणी युद्धनौका बुडवून मोठी चूक केली आहे. त्यांनी इशारा दिला की अमेरिकेला त्यांच्या कृतींचे परिणाम भोगावे लागतील. अराघची यांनी सोशल मीडियावर लिहिले की, हा हल्ला आंतरराष्ट्रीय पाण्यात झाला, जो इराणी किनाऱ्यापासून सुमारे ३,००० मैल अंतरावर होता. त्यांनी सांगितले की, त्यावेळी हे जहाज भारतीय नौदलाचे पाहुणे होते आणि त्यात सुमारे १३० खलाशी होते.**

जहाजावर सुमारे १८० नौसैनिक होते. बेपत्ता लोकांच्या शोधासाठी शोध आणि बचाव कार्य सुरू आहे. ही इराणी युद्धनौका गेल्या महिन्यात भारताच्या विशाखापट्टणम येथे आयोजित २०२६ च्या आंतरराष्ट्रीय फ्लीट रिव्ह्यूमध्ये भाग घेऊन परत येत होती.

श्रीलंकेच्या अधिकाऱ्यांनी अल जजीराला सांगितले की, बुधवारी सकाळी सुमारे ६ ते ७ वाजण्याच्या दरम्यान (भारतीय वेळेनुसार) मदतीसाठी संदेश पाठवला. हे जहाज दक्षिण श्रीलंकेतील गाले शहरापासून सुमारे ४० सागरी मैल (सुमारे ७५ किलोमीटर) दूर होते. इस्त्रायली सैन्याने इराणी क्षेपणास्त्र प्रक्षेपक नष्ट केले इस्त्रायली सैन्याने सांगितले की त्यांनी इस्त्रायलच्या कोम शहरात एक बॅलिस्टिक क्षेपणास्त्र प्रक्षेपक नष्ट केला, जो इस्त्रायलवर हल्ला करण्याच्या तयारीत होता. इस्त्रायली लष्कराचे प्रवक्ते अवीचाई अद्राई म्हणाले की इस्त्रायली हवाई दलाने इस्फहान शहरात एक हवाई संरक्षण प्रणाली देखील नष्ट केली. इराणचे ऊर्जामंत्री अब्बास अलीबादी यांनी सांगितले की अमेरिका आणि इस्त्रायली हल्ल्यांमुळे देशाच्या अनेक भागात पाणी आणि वीज पुरवठा विस्कळीत झाला आहे. जीवनावश्यक वस्तूंचा अखंड पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी दुरुस्तीचे काम सुरू आहे.

## महाराष्ट्राची गतिमान अर्थव्यवस्था
## वार्षिक पाहणी अहवालातून स्पष्ट

मुंबई (वृत्तंस्था)

राज्याच्या २०२५-२६ आर्थिक पाहणी अहवालानुसार महाराष्ट्र ही देशातील सर्वात मजबूत आणि गतिमान अर्थव्यवस्थांपैकी एक असल्याचे स्पष्ट झाले आहे. शेती, उद्योग आणि सेवा या तिन्ही क्षेत्रांतील वैविध्यपूर्ण रचना ही राज्याच्या अर्थव्यवस्थेची मोठी ताकद असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. या तिन्ही क्षेत्रांच्या संतुलित विकासामुळे महाराष्ट्राची आर्थिक घोडदौड सातत्याने कायम राहिल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे.

अहवालानुसार राज्याच्या अर्थव्यवस्थेत २०२५-२६ या आर्थिक वर्षात सुमारे ७.९ टक्क्यांची वाढ होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. गेल्या काही वर्षांत राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक झाली असून त्यातून पायाभूत सुविधांच्या विकासाला मोठी चालना मिळाली आहे. रस्ते, मेट्रो प्रणाली, बंदरे, विमानतळ, औद्योगिक कॉरिडॉर आणि लॉजिस्टिक नेटवर्क या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक झाल्याने राज्यात पायाभूत सुविधांचा वेगाने विकास झाल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. व्यवसाय सुलभता वाढविण्यासाठी शासनाने विविध सुधारणा राबविल्या असून डिजिटल गव्हर्नन्सला चालना देणे आणि क्षेत्रनिहाय वाढीस प्रोत्साहन देणे यावर भर देण्यात आला आहे. या सुधारणांमुळे राज्याची स्पर्धात्मकता अधिक मजबूत झाली असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे राज्याची अर्थव्यवस्था सलग पाचव्या वर्षीही वाढीचा वेग कायम राखेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. २०२५-२६ या वर्षातील आगाऊ अंदाजानुसार राज्याच्या अर्थव्यवस्थेची वाढ २०२४-२५ च्या तुलनेत ७.९ टक्के राहण्याची शक्यता आहे. या कालावधीत कृषी आणि संलग्न क्रियाकलाप क्षेत्राची वाढ ३.४ टक्के, उद्योग क्षेत्राची वाढ ५.७ टक्के आणि सेवा क्षेत्राची वाढ ९.० टक्के इतकी राहण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. (पान ४ वर)

# अनधिकृत प्री-प्रायमरी शाळांवर कारवाई कधी ?

## विधानसभेत आ. सत्याजीत तांबे यांचा सरकारला थेट सवाल...




मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील अनधिकृत प्री-प्रायमरी व नर्सरी शाळांच्या वाढत्या प्रश्नावर विधानसभेत तीव्र चर्चा रंगली. या गंभीर विषयाकडे लक्ष वेधत आमदार सत्यजीत तांबे यांनी सरकारला थेट जाब विचारत ठोस कारवाईची मागणी केली. सहा वर्षांपूर्वी शासनाने धोरण जाहीर करूनही प्रत्यक्षात कोणतीही प्रभावी अंमलबजावणी झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला.तांबे यांनी सभागृहात सांगितले की, सध्या राज्यात प्री-प्रायमरी व नर्सरी वर्ग सुरू करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाची कोणतीही अनिवार्य परवानगी लागत नसल्याने अनेक ठिकाणी बंगल्यांमध्ये, दोन खोल्यांमध्ये किंवा अपुऱ्या जागेत शाळा सुरू आहेत. या ठिकाणी ना पुरेशी सुरक्षा व्यवस्था, ना शासकीय नियंत्रण - परिणामी लहानग्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

तांबे यांनी शालेय वाहतुकीतील गंभीर बाबींचाही उल्लेख केला. शाळेच्या बसमध्ये क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी, रिक्षांमध्ये दहा-दहा मुलांची कोंबून वाहतूक. या घटनांमुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असल्याचे त्यांनी नमूद केले. लहान मुलांचा प्रश्न आहे. त्यांच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड चालणार नाही, असे ठाम मत त्यांनी व्यक्त केले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत खाजगी बालवाटिकांची अनिवार्य नोंदणी करण्यासाठी अधिनियम प्रस्तावित असल्याचे सरकारकडून वारंवार सांगितले जाते. मात्र हा अधिनियम नेमका कधी लागू होणार? अंमलबजावणीची सुरुवात कधीपासून? अनधिकृत शाळांवर कारवाई कधी? केवळ 'लवकरच' हा शब्द पुरेसा नाही; सरकारने ठोस तारीख जाहीर करावी, अशी ठाम मागणी तांबे यांनी सभागृहात केली.

या प्रश्नावर उत्तर देताना राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी संबंधित अधिनियम अंतिम टप्प्यात असून तो लवकरच सभागृहात मांडला जाईल, असे स्पष्ट केले. मात्र अंमलबजावणीची नेमकी वेळ सांगितली नाही.

राज्यात वाढत असलेल्या अनधिकृत प्री-प्रायमरी शाळांच्या पार्श्वभूमीवर आता सरकार नेमकी कोणती पावले उचलते आणि मुलांच्या सुरक्षेसाठी ठोस यंत्रणा केव्हा उभी राहते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बिहारमध्ये राजकीय उलथापालथ

## नीतिश कुमार राज्यसभेवर, भाजपचा बनणार मुख्यमंत्री



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

बिहारच्या राजकारणात आज एक अत्यंत मोठा आणि ऐतिहासिक घडामोड घडली आहे. मुख्यमंत्री नीतीश कुमार यांनी मुख्यमंत्रिपद सोडण्याचा आणि राज्यसभेवर जाण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे बिहारमध्ये प्रथमच भाजपचा मुख्यमंत्री होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

गेल्या दोन दशकांहून अधिक काळ बिहारच्या राजकारणाचे केंद्रस्थान राहिलेले नीतीश कुमार आता राज्याच्या राजकारणातून दिल्लीच्या राजकारणात प्रवेश करत आहेत. त्यांनी स्वतः सोशल मीडियाच्या माध्यमातून आपण राज्यसभेवर जाणार असल्याचे जाहीर केले आहे. या निर्णयामुळे बिहारच्या राजकारणात आता सत्तेचे नवे समीकरण आकारास येत आहे. हिंदी भाषिक राज्यांमध्ये बिहार हे एकमेव असे राज्य होते जिथे अद्याप भाजपचा मुख्यमंत्री झाला नव्हता. नीतीश कुमार यांच्या राजीनाम्यानंतर भाजपचे आता हे स्वप्न पूर्ण होणार आहे. एनडीएच्या सूत्रानुसार, आता मुख्यमंत्रीपद भाजपकडे जाईल, तर जेडीयूच्या वाट्याला उपमुख्यमंत्रीपद येणार आहे. २०२५ च्या विधानसभा निवडणुकीत एनडीएच्या विजयानंतर नीतीश कुमार यांनी सन्मानाने पद सोडण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे.

नीतीश कुमार यांचे पुत्र निशांत कुमार हे आता बिहारचे नवे उपमुख्यमंत्री होऊ शकतात. निशांत कुमार विधान परिषदेच्या माध्यमातून मंत्रिमंडळात प्रवेश करतील. त्यांना पक्षातील वरिष्ठ नेत्यांचा पूर्ण पाठिंबा असल्याचे समजते. जेडीयू कोट्यातून दुसऱ्या उपमुख्यमंत्रीपदासाठी विजय चौधरी आणि अशोक चौधरी यांची नावेही चर्चेत आहेत.

नीतीश कुमार यांच्या या निर्णयामुळे जेडीयूच्या गोटात काही प्रमाणात नाराजी पाहायला मिळत आहे. आमदार दलाची बैठक न घेता इतका मोठा निर्णय घेतल्याने कार्यकर्ते नाराज आहेत. अशा महत्त्वाच्या निर्णयावर विधिमंडळ पक्षात चर्चा होणे गरजेचे होते, असे काही आमदारांचे मत आहे. लवकरच या संदर्भात आमदार दलाची बैठक बोलावली जाण्याची शक्यता आहे. बिहारमधून राज्यसभेच्या ५ जागांसाठी १६ मार्च रोजी मतदान होणार असून गुरुवारी (आज) नामांकनाचा शेवटचा दिवस आहे.

# बोगस प्रमाणपत्र

## बांधकाम कामगार कल्याण मंडळ अधिकाऱ्यांनीच लाटले साडेतीन कोटी



मुंबई (वृत्तसंस्था)

भाजप आमदार विजयकुमार देशमुख यांनी तारांकित प्रश्न मांडण्यापूर्वीच ३ अधिकाऱ्यांचे निलंबन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील बांधकाम कामगारांची मुले परराज्यात उच्चशिक्षण घेत असल्याचे बोगस प्रमाणपत्र दाखवत शिष्यवृत्तीचे ३ कोटी २६ लाख लाटले. या प्रकरणी तालुका निरीक्षक अजिंक्य पवार, संतोषसिंग राजपूत आणि उज्वल सूर्यवंशी यांच्यावर बुधवारी निलंबनाची कारवाई करण्यात आली. बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे बांधकाम कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना आहे. कामगारांच्या पाल्यांना उच्चशिक्षणासाठी प्रतिवर्षी प्रत्येकी ६० हजार रुपये शासनाकडून मिळतात. सोलापूर जिल्ह्यात सुमारे एक लाखांपेक्षा अधिक बांधकाम कामगारांची नोंद आहे. त्यातील बांधकाम कामगार कल्याण विभागाकडे यातील २२३ लाभार्थ्यांनी सहा महिन्यांपूर्वी आपल्या पाल्यांच्या नावे पैसे उचलल्याची तक्रार दिली होती. मात्र संबंधित अधिकाऱ्यांकडून त्याची दखल घेण्यात आली नाही. तत्कालीन कामगार आयुक्तांनीही या तक्रारीची दखल घेतली नाही. त्यानंतर भाजप आमदार विजयकुमार देशमुख यांनी याबाबत अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल केला आहे. मात्र हा प्रश्न मांडण्यापूर्वीच सहाय्यक कामगार आयुक्तांकडून संबंधितांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली.







# महिला साहित्य संमेलनाध्यक्षपदी नीलिमा क्षत्रिय यांची निवड

युवावार्ता (प्रतिनिधी)


संगमनेर - ज्ञानकौशल्य ट्रस्ट व कर्मलक्ष्मी महिला मंडळ (मांडवगण) यांच्यातर्फे १० मार्च रोजी एकदिवसीय पहिले संत कान्होपात्रा महिला साहित्य संमेलन होत आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी संगमनेर येथील साहित्यिक नीलिमा क्षत्रिय यांची निवड झाल्याची माहिती संयोजन समितीच्या अध्यक्षा जयश्री मेटे यांनी दिली.



महिला साहित्य संमेलन निमंत्रण समितीच्या अध्यक्षा व कर्जत येथील कवयित्री स्वाती पाटील योच्या अध्यक्षतेखाली नुकतीच संयोजन समितीची बैठक घेण्यात आली. यामध्ये संयोजन समितीच्या कार्याध्यक्ष यमुना कांडेकर-कर्डिले, निमंत्रण समिती कार्याध्यक्ष रूपाली सोनवणे, समन्वयक साहित्यिक प्रा. हेमलता पाटील, सहसमन्वयक भारती गवळी, संघटक दीपाली तवले, सहसंघटक रूपाली गायकवाड, संयोजन समिती सदस्य अश्विनी झगडे, पायल बरबडे, प्रिया धामणे, ज्ञानकौशल्य ट्रस्टच्या सचिव माधुरी चोभे आणि कर्मलक्ष्मी महिला मंडळाच्या अध्यक्षा मार्या थोरात आदी उपस्थित होते.

महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर आणि पहिल्या महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले (पान ४)

# इराणमधील तणावामुळे महाराष्ट्रातील तरुण अडचणीत - आ. सत्यजीत तांबे



युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या या गंभीर प्रसंगात राज्यातील नागरिकांची सुरक्षित सुटका आणि त्यांना तातडीची मदत मिळावी, यासाठी शासनाने अधिक वेगाने आणि ठोस पावले उचलावीत.
– आ.सत्यजीत तांबे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यात वाढत चाललेल्या युद्धजन्य तणावाच्या पार्श्वभूमीवर इराण तसेच शेजारील देशांमध्ये रोजगारासाठी गेलेले महाराष्ट्रातील अनेक तरुण अडचणीत सापडल्याची गंभीर बाब आज विधानसभेत आमदार सत्यजीत तांबे यांनी उपस्थित केली.

या संघर्षामुळे संबंधित भागातील परिस्थिती दिवसेंदिवस चिघळत असून, सुरक्षिततेच्या दृष्टीने अनेक भारतीय नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. महाराष्ट्रातील काही तरुणांनी राज्य शासनाच्या हेल्पलाईनशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद मिळत नसल्याच्या तक्रारी आमदार तांबे यांनी सभागृहात मांडल्या.

राज्य शासनाने अधिक सक्रिय व्हावे असे आवाहन आ. तांबे यांनी सभागृहात केले. इराणमधील वाढत्या तणावामुळे निर्माण झालेली परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याचे नमूद करत आमदार तांबे यांनी राज्य शासनाने अधिक सक्रिय आणि समन्वयित भूमिका घ्यावी, अशी ठाम मागणी केली. सध्याची यंत्रणा अपुरी ठरत आहे. महाराष्ट्र शासनाने स्वतंत्र, प्रभावी आणि तत्काळ प्रतिसाद देणारी हेल्पलाईन सुरू करावी. तसेच अडकलेल्या नागरिकांच्या सुरक्षित सुटकेसाठी केंद्र शासन व भारतीय दूतावासाशी समन्वय वाढवावा, असे त्यांनी स्पष्ट केले. या विषयावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, केवळ भारतीय दूतावासाशी संपर्क करून प्रश्न सुटणार नाही, याची शासनाला पूर्ण जाणीव आहे. त्यामुळे मदत व पुनर्वसन मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे या प्रकरणाची विशेष जबाबदारी सोपविण्यात आली आहे. अडकलेल्या नागरिकांसाठी स्वतंत्र व्हॉट्सअॅप क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला असून, आवश्यक ती मदत आणि समन्वय साधला जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाकडून होणाऱ्या पुढील हालचालींकडे सर्वांचे लक्ष लागले असून, परदेशात अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांच्या कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

# भंडारदरा येथे 'धम्म-यात्रा' व कालकथित दादासाहेब रूपवते यांची 101 वी जयंती उत्साहात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सकाळच्या सत्रामध्ये भगवान गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर. महात्मा फूले व सर्वच महापुरुषांना अभिवादन करत का. दादासाहेब, का. प्रेमानंद व का. स्नेहजाताई रूपवते यांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात आले. पंचशील ध्वजरोहन व बुद्ध वंदनेचा कार्यक्रम पार पडला; जपान येथून आलेले भन्ते तेरासावा गुरुजी व पुणे येथील भंते नागघोष ज्यांनी उपस्थितांना धम्म-देसना दिली. सुशिलाबाई दादासाहेब रूपवते यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

दुपारी शेंडी गावातील का. यशवंतराव भांगरे यांच्या पुतळ्याला अभिवादन करून मिरवणूक काढण्यात आली; विविध गावांचे पारंपारिक वाद्य ताफे व महिलांच्या लेझीम पथकानी सर्वांचे लक्ष वेधले.

मुख्य धम्म सभेचे स्वागत व प्रास्ताविक उत्कर्षा रूपवते यांनी केले. सभेचे मुख्य वक्ते ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे, प्रा. आनंद देवडेकर, आमदार डॉ. किरण लहामटे व कॉ. डॉ. अजित नवले व लह यांनी आपले विचार व्यक्त केले. अॅड. संघराज रुपवते हे सभेच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी समाजाप्रती आपल्या कार्याबद्दल जेष्ठ कार्यकर्त्यांपैकी मा. बाबुराव निकाळे. बन्सीभाऊ त्रिभुवन. आर. एस. अभंग व सुरेश रोकडे यांना दादासाहेब रूपवते यांच्या नावाने जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.



पोपटराव सोनवणे व विनय घोसाळे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी दिलीप भांगरे, विजय वाकचौरे, विनय सावंत, एम.डी सोनवणे, सुधाकर देशमुख, सुरेश कोते, वी. एम. बैचे, हौसाबाई जगधने, अनुराधा आहेर, अजीज वोहरा, वैभव मोकळ, रविंद्र पवार, धम्मयात्रा ग्रामीण व मुंबई कमिटीच्या सर्व कार्यकर्त्यांसमवेत - बहुजन शिक्षण संघ, भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दल यांचे कार्यकर्ते, अकोले, संगमनेर, नाशिक, नगर, इगतपुरी, पुणे या भागातून कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# महिलांच्या सुरक्षेसाठी स्वच्छतागृहे उभारण्यासाठी नगराध्यक्षांना निवेदन

संगमनेर (प्रतिनिधी)

संगमनेर शहरात ग्रामीण भागातून येणाऱ्या महिलांसाठी स्वच्छ व सुरक्षित स्वच्छतागृहे बांधावी, अशा मागणीचे निवेदन जागृत महिला मंचच्या वतीने नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांना देण्यात आले.



तालुक्याच्या ग्रामीण भागातून दररोज हजारो महिला शहरात येतात. काही महिला बाजारात भाजीविक्रीसाठी, तसेच विविध कामांसाठी येत असतात. परंतु स्वच्छ आणि सुरक्षित प्रसाधनगृहे शहरात नसल्याने महिलांची गैरसोय होत आहे. सुरक्षितता व आरोग्याशी संबंधित या प्रश्नावर नवनिर्वाचित नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांनी लक्ष घालावे म्हणून जागृत महिला मंच व लोकपंचायत कार्यकर्त्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन नगराध्यक्षा यांना दिले. या संदर्भात त्यांनी प्रश्न समजून घेतले आणि योग्य त्या कार्यवाहीचे आश्वासन दिले.

याप्रसंगी जागृत महिला मंचच्या जिल्हाध्यक्षा वंदना रहाणे, जिल्हा उपाध्यक्षा मंदा घुले, संगमनेर तालुकाध्यक्षा साक्षी दिघे, जिल्हा सचिव आसमा शेख, सदस्य ज्योत्स्ना कदम, सुनीता खताळ, लक्ष्मी तुपसुंदर, शीतल पांडे, तारा वामन, निर्मला दिघे, मनीषा ढमाले, सोनाली माने, मंदा निळे, लोकपंचायत महिला आधार केंद्रप्रमुख सुरेखा उबाळे, प्रकल्प समन्वयक जयश्री जाधव, जागृत महिला मंच समन्वयक सविता पांडे, कार्यकर्त्या प्रियंका पठाडे, योगिता पवार, जिजा घोटकर, सोनाली भौरुले आदी उपस्थित होत्या.

# कर्जमाफीचा निर्णय लवकरच; कृषिमंत्री भरणे यांची माहिती

मुंबई (वृत्तसंस्था)

शेतकरी कर्जमाफीबाबत प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात अहवाल अपेक्षित आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार हे ३० जूनपूर्वी शेतकरी कर्जमाफीबाबत निर्णय जाहीर करतील, असे विधान कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधान परिषदेत केले



कलम २६० अन्वये झालेल्या चर्चेला उत्तर देताना कृषिमंत्री भरणे यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी शासन कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले. चर्चेत सत्तारूढ व विरोधी पक्षातील अनेक सदस्यांनी सहभाग घेतला होता. राज्यातील शेती अधिक सक्षम, आधुनिक आणि तंत्रज्ञानाधिष्ठित करण्यासाठी महाराष्ट्राने २०२५ ते २०२९ या कालावधीसाठी स्वतंत्र कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण जाहीर केले असून असे धोरण राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे, अशी माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. राज्यात हवामानातील अनिश्चितता, कीड-रोगांचा वाढता प्रादुर्भाव, उत्पादन खर्चातील वाढ व बाजारभावातील चढ-उतार यामुळे शेती अधिक जोखमीची झाली आहे. या पार्श्वभूमीवर दीर्घकालीन उपाय म्हणून 'माय ग्री' एआय धोरण आखण्यात आले आहे. या अंतर्गत हवामानाचा अचूक अंदाज, कीड-रोगाचा पूर्व इशारा, सिंचन व खत व्यवस्थापन मार्गदर्शन, बाजारभावाचा अंदाज, पीक उत्पादन वाढ होईल. यासाठी एआय, जनरेटिव्ह एआय, ड्रोन व रोबोटिक्सचा वापर होणार आहे. राज्यस्तरावर कृत्रिम बुद्धिमत्ता व ग्रीटेक नावीन्य केंद्र स्थापन करण्यात आले असून चारही कृषी विद्यापीठांत एआय संशोधन व इन्क्युबेशन सुविधा उभारल्या जाणार आहेत.कृषी विभागाने विकसित केलेल्या 'महाविस्तार' मोबाईल पचा ३० लाखांहून अधिक शेतकरी वापर करत आहेत. या पद्धारे पीक लागवड, रोगनियंत्रण, पाणी-खत व्यवस्थापन व बाजारभावाची माहिती घरबसल्या मिळते. २२-२३ फेब्रुवारी रोजी मुंबईत '-ख४-सीळ' जागतिक परिषद पार पडली असून त्यात राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांसह शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजनेतून मागील ९ वर्षांत सुमारे ३७,५०० कोटींपेक्षा जास्त नुकसानभरपाई देण्यात आली आहे. खरीप २०२५-२६ पासून उत्पादनावर आधारित सुधारित पीक विमा योजना लागू केली आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त दुग्धाभिषेक सोहळा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सालाबादप्रमाणे येथील शिवसेना प्रणित होय हिंदूच ग्रुपच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त दुग्धाभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार दिनांक ६ मार्च रोजी सकाळी साडेसात वाजता अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. गेल्या सतरा ते अठरा वर्षांपासून ही परंपरा अखंडपणे सुरू असून, दरवर्षी मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने हा सोहळा साजरा केला जातो. मराठी आणि हिंदू समाजाला ताठ मानेने जगण्याची प्रेरणा देणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची आठवण ठेवत त्यांच्या जयंतीनिमित्त हा दुग्धाभिषेक करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवसेना शहरप्रमुख तथा होय हिंदूच ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष रवींद्र उर्फ पप्पू कानकाटे यांनी केले आहे. तसेच ग्रुपचे सदस्य विनोद वाडेकर, कैलास गायके, नितीन पारखे, सागर ढेंबे, सागर कानकाटे, अक्षय भागवत, केशव वर्पे, किरण गुंजाळ, इरफान शेख, भाऊसाहेब धुमाळ, अनिकेत लिंगायत, अजय भागवत, संतोष दिवेकर, संतोष पुंड, रमेश गायकवाड, राहुल घाटकर व अजित वाकचौरे यांनीही उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# अजितदादांच्या विमान अपघाताचे धुके अधिक गडद

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेबाबत गेल्या काही दिवसांमध्ये सुरु असलेल्या आरोप-प्रत्यारोपांमुळे प्रचंड संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. रोहित पवार यांनी अनेक पत्रकार परिषदा घेऊन अजित पवार यांच्या मृत्यूबाबत व्हीएसआर कंपनी आणि नागरी उड्डाण संचलनालय (डीजीसीए) काहीतरी माहिती दडवत असल्याचा आरोप केला होता. अजित पवार गटातील अनेक आमदारांनीही रोहित पवारांच्या या भूमिकेची पाठराखण केली आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या चौकशीसाठीचा राज्य सरकारवरील दबाव वाढला होता. या पार्श्वभूमीवर अजित पवारांच्या अपघाताचा तपास असलेल्या सीआयडीने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या प्रकरणाचा तपास करत असलेल्या सीआयडी पथकाने आता व्हीएसआर कंपनीचा मालक आर.के. सिंग याला चौकशीसाठी बोलावले होते. त्यानुसार आर.के. सिंग गुरुवारी पुण्यातील सीआयडी कार्यालयात चौकशीसाठी दाखल झाले. या चौकशीत सीआयडीच्या अधिकाऱ्यांकडून आर.के. सिंग यांना रोहित पवार यांनी केलेल्या आरोपांच्या अनुषंगाने प्रश्न विचारले जाण्याची शक्यता आहे. त्यावर आर.के. सिंग काय स्पष्टीकरण काय देणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

अजित पवार यांचा विमान अपघातामध्ये मृत्यू झाल्यानंतर आर.के. सिंह यांनी आपल्या कंपनीच्या विमानात कोणताही तांत्रिक बिघाड असल्याचा दावा फेटाळून लावला होता. त्यावेळी एकदाच प्रसारमाध्यमांसमोर आलेल्या आर.के. सिंह यांनी हे प्रकरण तापल्यानंतर नंतर या सगळ्याबाबत चकार शब्दही काढला नव्हता. व्हीएसआर कंपनी आणि केंद्रीय उड्डाणमंत्री राममोहन नायडू यांच्यावर रोहित पवार यांनी अनेक गंभीर आरोप केले होते. अजित पवार यांच्या विमानाचा वैमानिक ऐनवेळी बदलण्यात आला. या विमानामध्ये गरजेपेक्षा जास्त इंधनाचा साठा करुन ठेवण्यात आला होता. एवढेच नव्हे तर वैमानिक सुमित कपूर याने मुद्दाम विमान जमिनीवर आदळून स्फोट घडवून आणला, असे आरोप रोहित पवार यांनी केले होते. या सगळ्यात व्हीएसआर कंपनीची आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या राममोहन नायडू यांची भूमिका संशयास्पद असल्याचेही रोहित पवार यांनी म्हटले होते. त्यामुळे आज सीआयडीच्या अधिकाऱ्यांसमोर आर.के. सिंग काय जबाब देणार, हे पाहावे लागेल.

# जमीन सर्वेक्षण १५ दिवसांत पूर्ण होणार - मंत्री बावनकुळे

मुंबई (वृत्तसंस्था)

चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत घोषणा केली की, पुढील दोन वर्षांत महाराष्ट्रातील जमीन सर्वेक्षण १५ दिवसांत पूर्ण करण्यासाठी एक प्रणाली लागू केली जाईल. खाजगी संस्थांना परवाना देऊन ही प्रक्रिया जलद केली जाईल.राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत एक महत्त्वाची घोषणा केली. त्यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील जमीन सर्वेक्षण पुढील दोन वर्षांत १५ दिवसांत पूर्ण होईल यासाठी सरकार एक प्रणाली लागू करण्याचा विचार करत आहे.

सर्वेक्षण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच नोंदणी केली जाईल आणि सरकार या दिशेने पुढे जात आहे. परवानाधारक खाजगी सर्वेक्षण संस्थांद्वारे राज्यात लवकरच सर्वेक्षण सुरू होईल. आमदार श्वेता महाले यांच्या प्रश्नाच्या उत्तरात चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत ही घोषणा केली.राज्यातील जमीन सर्वेक्षण प्रक्रियेत मोठा बदल होत असल्याचे मंत्री बावनकुळे यांनी सांगितले. आमदार श्वेता महाले म्हणाल्या की, पदपथांचे मोजमाप आणि ७/१२ अद्ययावतीकरणाचे काम अतिशय संथ गतीने सुरू आहे, परंतु रोजगार सेवकांना त्यांचे वेतन मिळत नाही.उत्तर देताना मंत्र्यांनी सांगितले की, पदपथांचे सीमांकन आणि ७/१२ अंतर्गत शेतकऱ्यांच्या जमिनीची नोंदणी करण्यासाठी सरकारी निर्णय जारी करण्यात आला आहे. गाव पातळीवर याद्या तयार करण्यासाठी आणि भूमी अभिलेख विभागामार्फत सीमांकन करण्यासाठी जिल्हा आणि तहसील पातळीवर समित्या स्थापन करण्यात आल्या आहे.आता आमदारांऐवजी प्रांताधिकारी आणि भूमी अभिलेख अभियंता याची जबाबदारी घेतील. आतापर्यंत ६५,००० नोंदणी पूर्ण झाल्या आहेत. ७,००० शेतजमिनीच्या प्रकरणांचा निर्णय घेण्यात आला आहे. ३२,००० शेतकऱ्यांचे सीमांकन झाले आहे. ९७,००० पदपथांना प्रतिकात्मक क्रमांक देण्यात आले आहेत.

# नाशिकमध्ये बनावट 'ग्रामसेवक' नियुक्ती घोटाळा उघडकीस

नाशिक (प्रतिनिधी)

नाशिक जिल्हा परिषदेच्या नावाने बनावट ग्रामसेवक नियुक्ती पत्र उघडकीस आले आहे. सीईओ ओंकार पवार यांनी रुजू होण्यासाठी आलेल्या तरुणाविरुद्ध एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले आहे.नाशिक जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाशी संबंधित बनावट नियुक्ती आदेशाचे प्रकरण समोर आले आहे. प्रशासनाने या फसवणुकीला गांभीर्याने घेतले आहे आणि तात्काळ कायदेशीर कारवाई सुरू केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जिल्हा परिषद जिल्हा निवड समिती आणि ग्रामपंचायत विभागाच्या नावाने बनावट नियुक्ती पत्र तयार करण्यात आले होते. या पत्राद्वारे संबंधित व्यक्तीला ग्रामसेवक पदाची जबाबदारी स्वीकारण्याचे निर्देश देण्यात आले. या आदेशानुसार २७ फेब्रुवारी रोजी नाशिक पंचायत समिती कार्यालयात पदभार स्वीकारण्यासाठी ही व्यक्ती आली तेव्हा तेथील अधिकाऱ्यांना प्रकरण संशयास्पद वाटले.ख्य कार्यकारी अधिकारी यांनी एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी ओंकार पवार यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिले. प्राथमिक तपासात अक्षय सूर्यकांत चौधरी नावाच्या व्यक्तीने बनावट नियुक्ती आदेश तयार करून सरकार आणि जिल्हा परिषद प्रशासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न केल्याचे उघड झाले.

# ३१६ दिव्यांग अधिकारी - कर्मचारी बोगस

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यात बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून शासकीय नोकरी मिळवलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांविरोधात राज्य सरकारने कठोर कारवाई सुरू केली आहे. २८ जिल्हा परिषदांमधील एकूण १०,९२२ र दिव्यांग अधिकारी व कर्मचाऱ्यांपैकी ६,२१८ जणांची पडताळणी पूर्ण झाली असून त्यापैकी ३१६ जणांविरुद्ध शिस्तभंग, दिलेल्या लाभांची वसूली तसेच निलंबन इत्यादि कारवाई करण्यात येत आहे, अशी माहिती दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांनी विधान परिषदेत दिली.



दिव्यांग योजनांचा गैरवापर रोखण्यासाठी सर्व ३४ जिल्हा परिषदांना व्यापक पडताळणीचे आदेश दिव्यांग कल्याण विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिले आहेत. या कारवाईमुळे बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे शासकीय सेवेत दाखल झालेल्यांना ठोस संदेश गेला असून पुढील काळात कठोर पावले उचलली जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

भाजप आ. श्रीकांत भारतीय यांनी विधानसभेत लेखी प्रश्न उपस्थित करून या प्रकरणाकडे लक्ष वेधले होते. त्याला उत्तर देताना मंत्री सावे यांनी स्पष्ट केले की, ३१६ अधिकारी-कर्मचारी दिव्यांग प्रमाणपत्र नसलेले, बनावट प्रमाणपत्र किंवा ४० टक्क्यांपेक्षा कमी दिव्यांगत्व असलेले आढळून आले आहेत. अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शिस्तभंग, दिलेल्या लाभांची वसूली आणि निलंबन अशी कारवाई करण्यात येत आहे. हजारो कर्मचाऱ्यांची तपासणी बाकी आहे.

# अहिल्यानगरात जनगणना पहिल्या टप्प्यासाठी प्रशिक्षण सुरु

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- भारतातील जनगणना २०२७ ही देशाच्या विकास नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून या कामात अचूक माहिती संकलन आणि प्रभावी समन्वय आवश्यक आहे. जनगणना प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तीन दिवसीय प्रशिक्षणातून दिल्या जाणाऱ्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करून आपली जबाबदारी दक्षतेने पार पाडावी, अशी सूचना जिल्हा जनगणना अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी केली.

जिल्हाधिकारी कार्यालयात जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यासाठी जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमास प्रारंभ झाला असून हे प्रशिक्षण दि. ४ मार्च ते ६ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. यावेळी जनगणना संचालनालयाचे उपसंचालक सागर बागुल, जिल्हा समन्वयक श्रीकांत बनकर, तहसीलदार नागेश गायकवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती.

निवासी उपजिल्हाधिकारी श्री. गिते म्हणाले, सन २०११ नंतर ही जनगणना होत असून यावेळेसची जनगणना ही डिजिटल पद्धतीने होणार आहे. नियुक्त अधिकाऱ्यांनी जनगणनेबाबत शासनाने दिलेल्या नियमावलीचा, सूचनांचा सखोल अभ्यास करावा. सर्वांनी गांभीर्याने प्रशिक्षण पूर्ण करावे. प्रगणकांच्या नियुक्त्या करून त्यांनाही प्रशिक्षित करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. जनगणना संचालनालयाचे उपसंचालक सागर बागुल यांनी प्रशिक्षणामध्ये जनगणना प्रक्रियेतील विविध टप्पे, माहिती संकलनाची पद्धत, तांत्रिक बाबी तसेच शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या प्रशिक्षण सत्रास सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार यांच्यासह महानगरपालिका, नगर परिषद, महसूल विभाग, शिक्षण विभाग तसेच विविध शासकीय कार्यालयांतील जनगणना अधिकारी, प्रभारी अधिकारी, प्रभारी लिपिक व तांत्रिक सहायक आदी उपस्थित होते.

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफ्रुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्ट्स्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरक्षित, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग - प्रसुति
• मुळव्याध-भगंदर-फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत (M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
Help Line : 7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५९०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# महिलांचे मौखिक आरोग्य - वेळेवर काळजी म्हणजे आयुष्यभराची स्मितरेषा




महिला म्हणजे कुटुंबाचा आधारस्तंभ. ती स्वतःच्या आरोग्यापेक्षा कुटुंबाची काळजी जास्त घेते. पण महिला दिनाच्या निमित्ताने प्रत्येक महिलेला एक संदेश - आपले आरोग्य प्रथम! यामध्ये मौखिक आरोग्य अत्यंत महत्त्वाचे आहे. निरोगी दात व हिरड्या केवळ सुंदर हास्यासाठी नव्हे, तर संपूर्ण शरीराच्या आरोग्यासाठी आवश्यक आहेत.

वेळेवर दंत तपासणी का आवश्यक? दर ६ महिन्यांनी दंतचिकित्सकांकडे तपासणी करणे गरजेचे आहे. लहान कीड (कॅव्हिटी) सुरुवातीला वेदनारहित असते. वेळेवर उपचार केल्यास साधे फिलिंग करून दात वाचवता येतो. दुर्लक्ष केल्यास रूट कॅनल किंवा दात काढण्याची वेळ येऊ शकते. इंग्रजी म्हण आहे - अ स्टिच इन टाइम सेव्ह्ज नाईन. दातांच्या बाबतीतही हे तितकेच खरे आहे. वेळेवर केलेला छोटा उपचार मोठ्या खर्च व त्रासापासून वाचवतो.

आधुनिक दंत उपचार पद्धती आणि त्यांची सुरक्षितता आज दंतचिकित्सा क्षेत्रात अत्याधुनिक व सुरक्षित उपचार उपलब्ध आहेत. रूट कॅनल उपचार (रूट कॅनल ट्रीटमेंट - आरसीटी) मध्ये संसर्ग झालेला दात न काढता आतून स्वच्छ करून वाचवला जातो. हा उपचार पूर्णपणे सुरक्षित असून स्थानिक भूल दिल्यामुळे वेदनारहित असतो आणि यशाचे प्रमाण खूप जास्त असते.

दंत प्रत्यारोपण (डेंटल इम्प्लांट्स) ही हरवलेल्या दातासाठी प्रभावी पद्धत आहे. हरवलेल्या दाताच्या जागी कृत्रिम मुळ बसवून कायमस्वरूपी दात बसवला जातो. हे टायटॅनियमपासून बनवलेले असल्याने शरीरास सुरक्षित असते. ते नैसर्गिक दातासारखे दिसते व कार्य करते आणि दीर्घकालीन उपाय मानले जाते.

लेझर दंतचिकित्सा (लेझर डेंटिस्ट्री) ही आधुनिक पद्धत हिरड्यांचे आजार, पायरिया, गम सर्जरी इत्यादींसाठी वापरली जाते. या पद्धतीमध्ये रक्तस्राव कमी होतो, वेदना कमी होतात आणि रुग्ण लवकर बरा होतो. तसेच स्केलिंग व पॉलिशिंगद्वारे दातांवरील टार्टर काढून हिरड्यांचे आरोग्य सुधारते. हा उपचार पूर्ण सुरक्षित असून पायरिया टाळण्यासाठी आवश्यक आहे.

कॉस्मेटिक डेंटिस्ट्रीमध्ये दात पांढरे करणे (टीथ व्हाइटनिंग) आणि स्माईल डिझायनिंगसारख्या उपचारांचा समावेश होतो. या उपचारांमुळे आत्मविश्वास वाढतो आणि योग्य सल्ल्यानुसार केल्यास ते पूर्णपणे सुरक्षित असतात.

गर्भधारणेपूर्वी व गर्भधारणेदरम्यान दंत तपासणी का आवश्यक? गर्भावस्थेत हार्मोनल बदलांमुळे हिरड्यांची सूज, रक्तस्राव, पायरिया वाढू शकतो. तोंडातील संसर्ग आई व बाळ दोघांनाही अपायकारक ठरू शकतो. त्यामुळे गर्भधारणेपूर्वी सर्व आवश्यक दंत उपचार पूर्ण करणे उत्तम मानले जाते. नियमित तपासणीमुळे अकाली प्रसूतीचा धोका कमी होतो. म्हणूनच प्रत्येक महिलेला सल्ला - बाळाची योजना करण्यापूर्वी संपूर्ण दंत तपासणी करा.

बालदंतांचे (डिसिड्युअस टीथ) महत्त्व देखील तितकेच मोठे आहे. अनेक पालकांना वाटते की दुधाचे दात तात्पुरते असल्याने त्यांची काळजी आवश्यक नाही. परंतु योग्य चावणे व बोलणे यासाठी हे दात आवश्यक असतात. ते कायमस्वरूपी दातांच्या योग्य वाढीस मार्गदर्शक ठरतात. लहानपणीची कीड भविष्यातील दातांवर परिणाम करू शकते. म्हणूनच लहान मुलांची पहिली दंत तपासणी वयाच्या १ वर्षात करावी.

दात सरळ करण्याचे महत्त्व देखील लक्षात घेणे गरजेचे आहे. वाकडे दात केवळ दिसण्यावर परिणाम करत नाहीत, तर स्वच्छता राखणे कठीण होते, कीड व हिरड्यांचे आजार वाढतात आणि जबड्याच्या समस्या निर्माण होऊ शकतात. पारंपरिक ब्रेसेस (ब्रॅसेस) ही पद्धत प्रभावी व विश्वासार्ह असून सर्व प्रकारच्या समस्यांसाठी उपयुक्त आहे. तर पारदर्शक अलाइनर्स (क्लिअर अलाइनर्स) हे काढता येण्यासारखे, दिसायला जवळजवळ न दिसणारे असून प्रौढ महिलांसाठी लोकप्रिय पर्याय ठरत आहेत. दोन्ही पद्धती सुरक्षित असून तज्ञांच्या सल्ल्यानुसार योग्य पर्याय निवडावा.

महिला दिनानिमित्त प्रत्येक स्त्रीने स्वतःला एक वचन द्यावे - दर ६ महिन्यांनी दंत तपासणी करणे, योग्य तोंडी स्वच्छता राखणे आणि आवश्यक असल्यास आधुनिक उपचार वेळेत करून घेणे. निरोगी दात म्हणजे निरोगी शरीर, आत्मविश्वासपूर्ण हास्य आणि आनंदी जीवन. स्वतःची काळजी घ्या - कारण तुमचे हास्यच तुमची खरी ओळख आहे.

**डॉ. नितीन घुले, नित्यसेवा डेंटल क्लिनिक, विद्यानगर, संगमनेर मो. ९६०४५७१३२३**

# जय हिंद लोकचळवळीच्या उपक्रमातून बांध बांधणी व वृक्षारोपण



**नाशिक (युवावार्ता प्रतिनिधी)–** ग्रामीण भागातील आदिवासी समुदायाच्या उन्नतीसाठी नेहमीच प्रयत्नशील असणाऱ्या 'जय हिंद लोकचळवळ' या सामाजिक संस्थेने त्रंबकेश्वर तालुक्यातील वेंळुजे गावात एक महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला आहे. सिन्नर येथील इंटरनिस फाईन केमिकल या कंपनीने वृक्षारोपणासाठी दिलेल्या सीएसआर उपक्रमांतर्गत, स्थानिक आदिवासी शेतकऱ्यांच्या पडीक जमिनीवर जेसीबी मशिन्सच्या साहाय्याने मजबूत बांध घालण्याचे काम जोरात सुरू आहे. या बांधांमुळे वाहून जाणारे पाणी अडवले जाईल, ज्यामुळे या भागातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात शेती करण्याची संधी उपलब्ध होईल. याशिवाय, या बांधांवर संस्थेच्या वतीने विस्तृत वृक्षारोपण केले जाणार असून, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकासाला चालना मिळेल.

वेंळुजे गाव हे त्रंबकेश्वर तालुक्यातील असून, जिथे नैसर्गिक संसाधनांची विपुलता असूनही पाण्याचे दुर्भिक्ष आणि जमिनीची पडीक स्थितीमुळे शेतकरी वर्ग अनेक आव्हानांना तोंड देत आहे. जय हिंद लोकचळवळ या संस्थेने या समस्येची दखल घेत, स्थानिक शेतकऱ्यांसोबत चर्चा करून हा उपक्रम सुरू केला. बांध घालण्याचे काम सुरू झाल्याने आता या भागातील पाण्याचे संरक्षण होईल आणि शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढेल. यामुळे आदिवासी शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ मोठ्या प्रमाणात होणार आहे, ज्यामुळे त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडेल. संस्थेच्या या प्रयत्नांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल आणि स्थानिक समुदाय स्वावलंबी होण्याच्या दिशेने पाऊल टाकेल.

या उपक्रमाच्या प्रगतीची पाहणी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुधीर तांबे साहेब आणि सेक्रेटरी डॉ. नामदेवराव गुंजाळ यांनी आज गावाला प्रत्यक्ष भेट दिली. त्यांनी कामाच्या ठिकाणी जाऊन बारीकसारीक तपशीलांची तपासणी केली आणि स्थानिक आदिवासी शेतकऱ्यांशी संवाद साधला. या भेटीदरम्यान शेतकऱ्यांनी त्यांच्या समस्या आणि अपेक्षा व्यक्त केल्या, ज्यावर डॉ. तांबे आणि डॉ. गुंजाळ यांनी सकारात्मक प्रतिसाद देत समाधान व्यक्त केले. ते म्हणाले, आदिवासी समुदायाच्या सशक्तीकरणासाठी हे छोटेसे पाऊल मोठा बदल घडवू शकते. पाणी संरक्षण आणि वृक्षारोपण यामुळे निसर्ग आणि माणूस यांच्यातील सुसंवाद वाढेल. या वेळी नाशिक येथील श्री. मासुद आझादी. वर्पे सर हेही उपस्थित होते.

जय हिंद लोकचळवळ ही संस्था गेल्या काही वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक आणि पर्यावरणीय क्षेत्रात सक्रिय आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून संस्था केवळ शेती विकासावरच नव्हे, तर पर्यावरण संवर्धनावरही भर देत आहे. बांधांवर होणाऱ्या वृक्षारोपणामुळे मातीची धूप रोखली जाईल, जैवविविधता वाढेल आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यात मदत होईल. स्थानिक आदिवासींनी या उपक्रमाचे स्वागत केले असून, ते म्हणतात की अशा प्रयत्नांमुळे त्यांच्या पुढील पिढ्यांसाठी उज्ज्वल भविष्य घडेल. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्था स्थानिक प्रशासन, स्वयंसेवक आणि दानकर्त्यांसोबत वनखात्याचेही सहकार्य लाभत आहे. भविष्यात अशा आणखी उपक्रम राबवण्याचे संस्थेचे नियोजन आहे, ज्यामुळे ग्रामीण महाराष्ट्रातील आदिवासी भागांचा विकास होईल.

# हिवरगाव पावसा येथे देवगड चषक स्पर्धेचे आयोजन


## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते होणार उद्‍घाटन

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–** संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पावसा येथे भाजपा महायुती यांच्या वतीने देवगड चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार १ मार्च रोजी पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे. तसेच भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे, आ. अमोल खताळ, सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे मुख्य अभियंता राजेंद्र राहाणे यांची प्रमुख उपस्थिती असेल. देवगड देवस्थानच्या मैदानावर रविवार दि. ०१/०३/२०२६ ते शनिवार ०६/०२/२०२६ पर्यंत, सकाळी ०९ ते ०५ या कालावधीत भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा संपन्न होणार आहे.

स्पर्धेतील प्रथम विजेत्या संघास एकवीस हजार रुपयांचे पारितोषिक, तर द्वितीय पारितोषिक अकरा हजाराचे, तृतीय पारितोषिक सात हजाराचे, तसेच इतर अनेक पारितोषिक दिले जाणार आहे. स्पर्धेच्या आयोजनासाठी देवगड देवस्थान ट्रस्ट, सरपंच सेवा संघाचे बाबासाहेब पावसे, समर्थ एंटरप्रायजेस जे. सी. पी. स्पेअर, ओम साई हायड्रॉलिक, श्री गणेश अर्थमुव्हर्स, नितीन बन्सी पावसे, गणेश सातपुते, जय मल्हार कांती संघटना, ओम साई तरुण मित्र मंडळ, उमाजी नाईक मित्र मंडळ, शिवछत्रपती मित्र मंडळ, जय मल्हार क्रिकेट टीम, उंबरवाडी मित्र मंडळ, गुळगंगा मित्र मंडळ, म्हसोबा नगर मित्र मंडळ, कला सम्राज्ञी पवळा कला मंच, श्री गणेश मित्र मंडळ, जय भीम मित्र मंडळ, महायुती-भारतीय जनता पार्टी हिवरगाव पावसा यांचे विशेष सहकार्य लाभणार आहे.

स्पर्धेसाठी अकराशे रुपये प्रवेश फी आहे. सदर स्पर्धेत जास्तीत जास्त संघांनी सहभाग घेण्याचे आवाहन भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष काशिनाथ पावसे, भाजपा तालुका सरचिटणीस गणेश दवंगे, भाजपा तालुका उपाध्यक्ष केशव दवंगे यांच्यासह भाजपा महायुती हिवरगाव पावसा यांनी केले आहे.

# संत श्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज बीज...



महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. संतांनी आपल्याला जगण्याचा मार्ग वर्तमानात आहे, याचे भान दिले आहे. संतांच्या अभंगातून आपल्याला जगण्याची दिशा मिळते. आज संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज बीज आहे. फाल्गुन वद्य द्वितीयाला जगद्गुरु तुकाराम महाराज वैकुंठाला गेले, तो दिवस. या दिवशी देहू मधील नांदूरकीचा पावन वृक्ष वैकुंठ गमनाचे प्रतीक मानले जाते. आम्ही जातो आमच्या गावा, आमचा राम राम घ्यावा.

संत श्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या अभंगांवर लाखो लोक श्रीमंत झाले. नुसत्या एका अभंगावर कीर्तन करून लाखो रुपये कमावले. त्यांच्या प्रत्येक अभंगातून आपल्याला प्रेरणा मिळते. त्यांचे विचार हे सत्यशोधक विचार होते. भक्तीने आणि नीतिमत्तेने जीवन कसे जगावे, याचा मार्ग संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी दाखवला. स्वाभिमानाने कसे जगावे, कठीण प्रसंगात मनाचे संतुलन कायम कसे राखावे, याचीही शिकवण त्यांनी दिली. तुकाराम महाराजांचा अभंग आपल्याला प्रकाशाचा मार्ग दाखवतो. विठ्ठल भक्तीच्या माध्यमातून आत्मविश्वासाने जीवन जगण्याची शिकवण त्यांच्या प्रत्येक अभंगातून दिसते. तसेच तुकाराम महाराज हे सज्जनांसाठी नम्र आहेत आणि नाठाळ प्रवृत्तीच्या लोकांच्या विरोधात कणखरपणे उभे राहतात. जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती, देह कष्टविती परोपकारे।। भुती दया ओसंडली अंतर्गुणी। पाहिजे ते धनी देणार तो। नका हाव धरू कशाची रे मनी। पाहिजे ते धनी देणार तो।। तुका म्हणे धीर तोची साधू थोर।। कठीण प्रसंगात संकटात जो धीर सोडत नाही, तोच खरा साधू आणि तोच खरा पुरुष होय. कठीण प्रसंगात धैर्याने उभे राहणे, हाच मोठेपण आहे.

खरेतर इंद्रायणीच्या पाण्यावर दोन समर्थ स्वप्न या महाराष्ट्रात उभी राहिली. ज्ञानेश्वरी आणि गाथा. संत तुकारामांनी परंपरा स्वतःपासून सुरू केली. विचार आणि उत्कटता यांच्या अनुभूतीच्या मंथनातून अंतरज्ञानाचा जन्म होतो आणि माणूस हा अंतर्मुख होतो. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात, नित्य नवा दिस जागृतीचा। ब्रह्मज्ञान नव्हे लेकुरांच्या गोष्टी।

माणसाच्या जगण्याचा अर्थ गाथेमध्ये आहे. संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगात म्हटले आहे, सत्य असत्याशी मन केले ग्वाही। मानले नाही बहुमता।। लोक काय म्हणतील, याची पर्वा न करता ते आपले काम करीत राहिले. त्यांच्या प्रत्येक पावलामध्ये अभंग आहे. ते स्वतःच प्रकाश झाले. आपल्या अभंगात ते म्हणतात, नाही देवापाशी मोक्षाचे गाठोडे। मला मोक्ष नकोच, फक्त पांडुरंगाची चरण सेवा कायम मिळावी.

विष्णुसहस्त्रनामा वैकुंठ आहे. भगवान विष्णूंचे नाव आहे. वैकुंठ म्हणजे ज्याचा मार्ग कोणीही आडवू शकत नाही. भागवतात एक कथा आहे. शुभ्रा ऋषी आणि त्यांची पत्नी विकूंठा यांचा एक सात्विक आश्रम होता. त्या ठिकाणी इंद्र परीक्षा घेण्यासाठी आला. शुभ्रा ऋषींकडून त्याने तेज मागितले. परंतु ऋषी पत्नीने सांगितले, तुम्ही तुमचे तेज देऊ नका. कारण त्याचा उपयोग आश्रमातील शिक्षणासाठी होईल, आश्रमासाठी होईल, शिष्यांसाठी होईल. मी माझे तेज इंद्राला देते. म्हणून विकुंठाने आपले तेज देण्यास सुरुवात केली, तोच इंद्र जळायला लागला. इंद्राने थेट भगवान विष्णूंकडे धाव घेतली. भगवान विष्णू त्या ठिकाणी आले. त्यांना तो सात्विक आश्रम खूप आवडला. त्यांनी ऋषीला सांगितले, मी कोठेही नसलो तरी या ठिकाणी नक्कीच राहील. मला हा आश्रम आवडला. म्हणून त्यांनी त्या आश्रमाला वैकुंठ नाव दिले.

संत श्रेष्ठ तुकाराम महाराज हे वाळवंटातून पांडुरंगाकडे गेले आणि आभाळापासून आभाळापर्यंत गेले. भगवंताकडे त्यांनी हेचि दान देगा देवा तुझा विसर न व्हावा, हे मागितले. त्यांना विसर झालेलाच नव्हता. हे दान आपल्यासाठी त्यांनी मागितले. गाथा ही अंतकरणात उतरली पाहिजे. त्यातील एकेक शब्द म्हणजे अमृत आहे. त्यांच्या अभंगांनी आपल्या जगण्याला एक आयाम दिला, एक दिशा दिली. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज आपल्या जगण्याचा वर्तमान सोपा केला.

संत तुकारामांचा जगण्याचा श्वास हा विठ्ठल होता. विठ्ठल आणि संत तुकाराम महाराज हे एकरूप झाले आहेत. ते म्हणतात ना, लगे मुक्ती धनसंपदा। संत संग देई सदा। मला मुक्ती नको, कारण मुक्ती मिळाली तर आम्ही विठ्ठलाला मुकलो. मग भक्तीचा आनंद संपला. संत संगाने हा आनंद मिळतो. म्हणूनच जन्मोजन्मी गर्भवास सोसून तुझ्या सगुण भक्तीचा आनंद घेण्यात मजा आहे. आज संत तुकाराम महाराज बीज. आम्ही जातो आमच्या गावा, आमचा राम राम घ्यावा। तुमची आमची हेचि भेटी। येथूननिया या जन्म तुटी।। आता असो द्यावी दया। तुमच्या लागतसे पाया। येता निजधाम कोणी। विठ्ठल विठ्ठल बोला पाणी। राम राम कृष्ण मुखी बोला। तुका जातो वैकुंठाला। आकाशाएवढे संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या बद्दल मी जे काही लिहिले, ते माझे बोबडे बोल आहेत.

**– प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मो.न. ९८९०१६३६४२**

# पशुखाद्यातील जास्त प्रथिनांमुळे गायींचा मृत्यू, पशुवैद्यकीय तपासणीतील निष्कर्ष

**अहिल्यानगर (युवावार्ता प्रतिनिधी)–** नगर तालुक्यातील आदर्शगाव हिवरेबाजार व लगतच्या टाकळी खादगाव, तसेच पारनेर तालुक्यातील दैठणे गुंजाळ परिसरात गेल्या पंधरा दिवसांतच लागोपाठ ३१ गाई अज्ञात आजाराने दगावल्या. दुधाचे प्रमाण वाढवण्यासाठी पशुखाद्यातून प्रथिनांचा प्रमाणापेक्षा जास्त वापर केल्यामुळे 'अल्कलोसिस' (विषबाधासदृश्य) आजाराने अहिल्यानगर व पारनेर तालुक्यातील ३१ संकरित गायी दगावल्याचे पशुवैद्यकीय विभागाच्या प्रयोगशाळेत निष्पन्न झाल्याची माहिती पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. उमेश पाटील यांनी दिली.

अहिल्यानगर तालुक्यातील आदर्शगाव हिवरेबाजार व लगतच्या टाकळी खातगाव, तसेच पारनेर तालुक्यातील दैठणे गुंजाळ परिसरात गेल्या काही दिवसांत लागोपाठ ३१ गायी अज्ञात आजाराने दगावल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. आमदार काशिनाथ दाते व राज्य सरकारच्या आदर्शगाव योजनेचे राज्य कार्याध्यक्ष पोपटराव पवार यांच्याकडून चौकशीची मागणी करण्यात आली होती.

जिल्हा पातळीवरील पशुवैद्यकीय विभागाच्या तपासणीत गायी दगावण्याचे कारण निष्पन्न होऊ शकले नाही. त्यामुळे दगावलेल्या गायींचे नमुने प्रयोगशाळेत पाठवण्यात आले, मात्र त्यातही नेमके कारण आढळले नाही. त्यामुळे राज्य पातळीवरून क्रांतीसिंह नानासाहेब पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालयातील तज्ज्ञ व पशुरोग अन्वेषण प्रयोगशाळेच्या पथकांनी नमुन्यांची तपासणी केली.

त्यामध्ये गायींना कोरडा चारा न देता दूध वाढवण्यासाठी दिल्या जात असलेल्या पशुखाद्यांमध्ये प्रथिनांचे प्रमाण आवश्यकतेपेक्षा अधिक असल्याचे आढळले.

त्यातून 'अल्कलोसिस' (विषबाधासदृश्य) आजाराने गाईंचा मृत्यू झाल्याचे निदान करण्यात आले आहे. पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्त डॉ. पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार संकरित गाईंसाठी १६ ते २० टक्क्यांपर्यंत प्रथिने आवश्यक असतात. मात्र या घटनेमध्ये वापरल्या गेलेल्या पशुखाद्यामध्ये २४ टक्क्यांपेक्षा अधिक प्रमाणात प्रथिने होती. गायींना कोरडा चाराही दिला जात नव्हता. त्याचा परिणाम होऊन 'अल्कलोसिस' झाले व त्यातून गाईंचा मृत्यू झाल्याचे निदान प्रयोगशाळेच्या तपासणीमध्ये करण्यात आले आहे. दगावलेल्या ३१ पैकी ३० गाई संकरित (होस्टन प्रिझन) आहेत.

गाईंना संतुलित आहाराची आवश्यकता असते. अहिल्यानगर व पारनेर तालुक्यातील गाई दगावल्यांच्या घटनांमध्ये पशुखाद्यातील प्रथिनांचे प्रमाण आवश्यकतेपेक्षा जास्त आढळले व कोरडा चाराही दिला जात नव्हता. त्यातून 'अल्कलोसिस' होऊन झालेल्या आजाराला गाई बळी पडल्या. आता शेतकऱ्यांना गाईंच्या आहारात कोरडा चारा घालण्याचा व मुरघास देतानाही त्याला बुरशी लागलेली नसेल याची काळजी घेण्यास सांगितले आहे.

- डॉ. उमेश पाटील, सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन विभाग.

# संपादकीय...

## आखातातील तणाव आणि वाढती जागतिक महागाई

मध्यपूर्वेतील राजकीय तणाव पुन्हा एकदा उफाळून आला असून इस्त्रायल, अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्षाने जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. या संघर्षामुळे केवळ संबंधित देशच नव्हे तर संपूर्ण जग अस्वस्थ झाले आहे. अमेरिकेने आणि इस्त्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यामुळे आखाती प्रदेशात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या हल्ल्याची शक्यता यापूर्वीच व्यक्त करण्यात आली होती. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला कडक इशारे दिले होते. तरीही परिस्थिती इतक्या वेगाने युद्धात परिवर्तित होईल, अशी अपेक्षा अनेकांना नव्हती. इस्त्रायल आणि अमेरिकेने इराणविरुद्ध लष्करी कारवाई करण्यासाठी अत्यंत गुप्त आणि सुयोग्य योजना आखली होती. या कारवाईची माहिती इराणच्या गुप्तचर यंत्रणेला वेळेवर मिळू शकली नाही, ही बाब इराणसाठी मोठे धक्कादायक ठरली. या हल्ल्यात इराणच्या लष्करी नेतृत्वाला मोठा फटका बसला. देशाचे सर्वोच्च नेते आयातुल्ला खामेनी यांच्यासह अनेक वरिष्ठ लष्करी अधिकारी मारले गेल्याचे वृत्त समोर आले. एखाद्या राष्ट्रासाठी असे नेतृत्व गमावणे हे अत्यंत गंभीर असते. परंतु अमेरिकेच्या अपेक्षेप्रमाणे या घटनेनंतर इराण शरण येईल असे झाले नाही. उलट या घटनेने इराणमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आणि देशभरात राष्ट्रवादी भावना उफाळून आल्या. इराणने या हल्ल्याला प्रत्युत्तर देण्याचा निर्णय घेतला. त्यांनी इस्त्रायलच्या महत्त्वाच्या शहरांना लक्ष्य करत क्षेपणास्त्र हल्ले सुरू केले. याचबरोबर आखातातील ज्या देशांमध्ये अमेरिकेचे लष्करी तळ आहेत, त्या ठिकाणांवरही कारवाया करण्यात आल्या. त्यामुळे हा संघर्ष केवळ दोन किंवा तीन देशांपुरता मर्यादित न राहता संपूर्ण प्रदेशात पसरू लागला. इस्त्रायल आणि अमेरिकेनेही इराणच्या तेहरानसह अनेक शहरांवर क्षेपणास्त्र हल्ले सुरू ठेवले. युद्धाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत गेली. या संघर्षाला आठवडा उलटून गेला तरी तो थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत. उलट परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होत आहे. सुरुवातीला जलद विजयाची अपेक्षा व्यक्त करणाऱ्या अमेरिकेलाही आता हे युद्ध लवकर संपेल याची खात्री राहिलेली नाही. काही निवेदनांमध्ये हे युद्ध आणखी काही आठवडे चालू शकते, असे संकेत देण्यात आले आहेत. जर असे झाले, तर त्याचे परिणाम केवळ आखातातील देशांपुरते मर्यादित राहणार नाहीत. या युद्धाचा सर्वात मोठा परिणाम जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर होऊ लागला आहे. इराणने हॉर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याचा निर्णय घेतल्याने परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे. हॉर्मुझची सामुद्रधुनी ही जगातील सर्वात महत्त्वाच्या सागरी मार्गांपैकी एक मानली जाते. आखाती देशांमधून जगभरात जाणाऱ्या कच्च्या तेलाचा मोठा हिस्सा याच मार्गाने वाहून नेला जातो. अंदाजे दररोज सुमारे दोन कोटी बॅरल कच्चे तेल या सामुद्रधुनीतून जगभर पोहोचते. तसेच कतार आणि संयुक्त अरब अमिराती या देशांतून मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक वायूची निर्यातही याच मार्गाने होते. जर या सामुद्रधुनीतील वाहतूक खंडित झाली, तर जगभरात इंधनाचा मोठा तुटवडा निर्माण होऊ शकतो. इराणने या मार्गावर निर्बंध लादल्याने आधीच आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमतींमध्ये वाढ होऊ लागली आहे. गेल्या आठवड्यात कच्च्या तेलाचे दर प्रति बॅरल सुमारे ७२ डॉलर होते. मात्र संघर्ष तीव्र झाल्यानंतर ते ८० डॉलरच्या पुढे गेले आहेत. काही तज्ज्ञांच्या मते, युद्ध दीर्घकाळ सुरू राहिल्यास हे दर १५० ते २०० डॉलरपर्यंत पोहोचू शकतात. तेलाच्या किमतींमध्ये वाढ होणे म्हणजे संपूर्ण जगासाठी आर्थिक संकटाचे संकेत असतात. इंधन महागले की वाहतूक खर्च वाढतो, उत्पादन खर्च वाढतो आणि त्याचा परिणाम महागाईवर होतो. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनावर त्याचा थेट परिणाम होतो. विशेषतः विकसनशील देशांमध्ये महागाईचा फटका अधिक तीव्र असतो. अन्नधान्य, वाहतूक, औद्योगिक उत्पादन आणि ऊर्जा क्षेत्र यावर या परिस्थितीचा व्यापक परिणाम होऊ शकतो. याशिवाय जागतिक पुरवठा साखळीवरही या संघर्षाचा परिणाम होत आहे. सागरी मार्गांवरील असुरक्षिततेमुळे अनेक देशांनी सावध भूमिका घेतली आहे. जहाजवाहतूक कंपन्या मार्ग बदलण्याचा विचार करत आहेत. त्यामुळे व्यापार आणि उद्योग क्षेत्रात अनिश्चितता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय समुदायाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.

## एकलव्य बहुजन समाज पार्टीच्या महाराष्ट्र राज्याध्यक्षपदी कैलास पवार, सचिवपदी रवी अहिरे



लोणी (प्रतिनिधी)- राज्यस्तरावर शोषित, वंचित, दुर्लक्षित घटकासाठी कार्यरत असणारी आणि विस्थापित समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी धडपडणाऱ्या एकलव्य बहुजन समाज पार्टीच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी राहुरी तालुक्यातील बारागाव नांदूर येथील आंबेडकर चळवळीतील अभ्यासू व्यक्तिमत्व कैलास बाबुराव पवार यांची अध्यक्षपदी निवड केली असल्याची घोषणा एकलव्य बहुजन समाज पार्टीच्या लोणी येथील संपर्क कार्यालयामध्ये राष्ट्रीय अध्यक्ष रेवननाथ जाधव यांनी केली.

यावेळी पक्षाच्या महत्त्वाच्या पदावर काही पदाधिकाऱ्यांची निवड केली असून, पुढील प्रमाणे राष्ट्रीय महासचिव पदी डॉ. राहुल अहिरे, महाराष्ट्राचे सचिव पदी तुषार अहिरे, महाराष्ट्र राज्य प्रभारी गौरव माळी, माधव भांगरे यांची पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष, रामेश्वर जाधव यांची अहिल्यानगर जिल्हा प्रमुख पदी, तर राहुरी तालुका अध्यक्षपदी दौलत मार्तंड पवार, तर सिन्नर कार्याध्यक्षपदी रोशन अभंग आदी प्रमुख मान्यवरांची पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रेवणनाथ जाधव यांनी निवडी घोषित केल्या.

या पुढील काळामध्ये पक्षाच्या वरील पदाधिकाऱ्यांनी पक्ष वाढीसाठी गावोगावी शाखा उघडून पक्षाच्या माध्यमातून गरीब जनतेची सेवा करावी, तसेच विविध शासनाच्या योजना कॅम्प घेऊन पक्षाच्या माध्यमातून गरीब जनतेचे प्रश्न सोडवावेत, असे आवाहन करण्यात आले. लवकरच एकलव्य बहुजन समाज पार्टीच्या पक्षाचा मेळावा राहुरी येथे सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घेणार असून, राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत एकलव्य बहुजन समाज पार्टी ताकतीनिशी उतरणार असून, विधानसभेची जागा मित्रपक्षाने दिली तर ठीक, अन्यथा स्वबळावर लढणार असल्याची घोषणा राष्ट्रीय अध्यक्ष रेवणनाथ जाधव यांनी केली.

जिल्ह्यातील आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका ताकतीनिशी लढणार असून, अहिल्यानगर जिल्हा परिषदेचा अध्यक्ष हा आदिवासी समाजाचा होणार असून पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी ताकद लावून कामाला लागावे, असे आव्हान यावेळी रेवणनाथ जाधव यांनी केले आहे. सदर कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्याच्या अनेक जिल्ह्यांतून पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्राची गतिमान...(पान नं. १ वरुन)

आर्थिक पाहणी अहवालानुसार २०२५-२६ या वर्षासाठी प्रचलित किमतींनुसार राज्याचे स्थूल राज्य उत्पन्न सुमारे ५१,००,५९७ कोटी रुपये इतके राहण्याचा अंदाज आहे. तर स्थिर २०११-१२ च्या किमतींनुसार वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न २८,८२,६९९ कोटी रुपये इतके असण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. सध्या राज्यात विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असून या पार्श्वभूमीवर हा आर्थिक पाहणी अहवाल सादर करण्यात आला आहे. अर्थमंत्री असलेले अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उद्या स्वतः अर्थसंकल्प सादर करणार असल्याने या आर्थिक पाहणी अहवालाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

## महिला साहित्य... (पान १ वरुन)

यांच्या स्मृतिदिनानिमित्त नगरमध्ये हे साहित्य संमेलन होत आहे. संमेलनाध्यक्ष क्षत्रीय यांचे 'दिवस आलापल्लीचे' हे पुस्तक प्रकाशित आहे. राज्य शासनाचा त्यांना पुरस्कार मिळाला आहे. अनंत फंदी पुरस्कार (संगमनेर), मराठामंदिर पुरस्कार (मुंबई), पद्मश्री विखे पाटील साहित्य पुरस्कार (लोणी-प्रवरा, राहता), गिरिजा कीर पुरस्कारही त्यांना मिळाले आहेत.

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहमगदनगर**

ई-मेल : tahsildarakole@gmail.com दूरध्वनी (०२४२४) २२१२२८

क्र. कावी/जन्म/मृत्यु नोंद/२२/२०२६ दिनांक - २७/०२/२०२६

### जाहिरनोटीस

**विषयः- जन्म /मृत्यु नोंदीची जाहिर नोटीस प्रसिध्द करणेबाबत...**

**संदर्भ: श्रीम. सुनिता लक्ष्मण हिले रा. बलठण ता. अकोले जि. अहिल्यानगर यांचेकडील अर्ज दि. २७/०२/२०२६.**

ज्याअर्थी अर्जदार श्रीम. सुनिता लक्ष्मण हिले रा. बलठण ता. अकोले जि. अहिल्यानगर यांचे जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये अर्जदार यांचा जन्म दि. ०१/०६/१९७९ रोजी गोंदोशी येथे झाला त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय गोंदोशी यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद होण्याबाबतचा आदेश होणेकामी अर्ज तहसिल कार्यालयात दाखल केला आहे. तरी अर्जदार श्रीम. सुनिता लक्ष्मण हिले रा. बलठण ता. अकोले जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असुन अर्जदार यांचा जन्म दि. ०१/०६/१९७९ रोजी गोंदोशी येथे झाला या बाबतची नोंद ग्रामपंचायत कार्यालय गांदोशी येथे होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द आल्यापासुन ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालयासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजून मे. तहसिलदार साहेबांसमोर पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

**तहसिलदार अकोले**


Sangamner Medical Foundation & Research Institute Sangamner.

**DR. ITHAPE INSTITUTE OF PHARMACY**

At- Velhale, Post-Rajapur, Tal- Sangamner Dist-Ahmednagar Pin -422605
https://drithapepharmacy.com/ E-mail- ithapeinstitute2019@gmail.com

DTE CODE: 5482 MSBTE CODE:1935

(Approved by Pharmacy Council of India, New Delhi, Govt. of Maharashtra and Affiliated by Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere and Maharshtra State Board of Technical Education, Mumbai)

**Recruitment A.Y. 2025-26**

Application from the eligible and desirous candidates are invited for immediate recruitment for the following post.

| Course-B Pharmacy | | |
|---|---|---|
| **Designation** | **Subject** | **No. of Post** |
| Principal | Any Specialization | 01 |
| Assistant Professor | Quality Assurance | 01 |
| | Pharmaceutical Chemistry | 02 |
| | Pharmacology | 01 |
| Lecturer | B. Pharmacy | 01 |
| Assistant Librarian | B.Lib/M.Lib | 01 |
| Lab Technician | D. Pharmacy | 01 |
| Lab Assistant | HSC/Graduation | 02 |
| Store Keeper | Any Graduation | 01 |

1. The application Giving full particulars and attested copies of supporting documents should reach to the under signed "The President/ Principal", SMFRI'S Dr. Ithape Institute of Pharmacy, Velhale, P.O. Rajapur, Tal. Sangamner, Dist. Ahmednagar- 422605, within 7( Seven) days from the publication of this advertisement.

**President**
**Sangamner Medical Foundation & Research Institute, Sangamner**



CorelDRAW Ps Ai Id

WE ARE HIRING
JOIN OUR TEAM

GRAPHIC DESIGNER

Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005








MALPANI

卐 अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर 卐

**मालपाणी उद्योग समूह** आयोजित

**भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!**

रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण - मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर

- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

**सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा**

नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक

**विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!**

संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर

श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)



**पाहिजेत**
नामांकित साऊथ इंडीयन कॅफेसाठी
कॅशियर हेल्पर
साऊथ इंडीयन कुक
१ ते २ वर्षांचा कामाचा अनुभव आवश्यक
संगमनेर
9518722868

**पाहिजेत**
अकाऊंटट - २ जागा
( टॅली कोर्स )
ड्रायव्हर - ३ जागा
संपर्क - डॉ. इथापे हॉस्पिटल, नवीन नगर रोड, संगमनेर
9370071717
9822791484

**पाहिजेत**
अनुभवी व गरजू
साईट सुपरवायझर
साईट इंजिनियर
१ ते २ वर्षांचा अनुभव आवश्यक
चिंतामणी डेव्हलपर्स, संगमनेर
7741057560

**पाहिजेत**
होलसेल दुकानासाठी मुले/ मुली पाहिजेत
अनुभवास प्राधान्य
हेल्पर - २
सेल्समन - २
7020585298
9422905155

**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत
वेल्डर
हेल्पर
7972963397

**पाहिजेत**
कन्स्ट्रक्शन सुपरवाईजर
डिप्लोमा/ डिग्री इंजिनिअर
अनुभवास प्राधान्य
संपर्क - करवा एजन्सीज बस स्टँड मागे, संगमनेर
9422762700

**बौद्ध वधू पाहिजे**
वर वय ३७, प्रोफेसर, गोरा, उंच आकर्षक व्यक्तीमत्व, घटस्फोटीत (अपत्य नाही)
अपेक्षा - अविवाहित वधुला प्राधान्य, विवाहित (अपत्य नसलेली) गृहिणी धार्मिक शाकाहारी, जातीची अट नाही.
अनुरूप पाहिजे
9922221693
घुलेवाडी, ता. संगमनेर

**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**

त्वरीत पाहिजेत
सेल्सपर्सन ०६ जागा
(अनुभवी पुरुष / महिला) आकर्षक पगार व सवलती
संपर्क - 75882 49849, 9860444881
जानकीराम गंगाधर काजळे (ज्वेलर्स)
मेनरोड, राजेंद्र क्लॉथ समोर, संगमनेर, ०२४२५, ७५८८२४९८४९

सिद्धार्थ एंटरप्राईजेस, संगमनेर, कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड,
पेपर डिलिंग कंपनी करिता खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्झीक्युटिव -१ — एमबीए असल्यास प्राधान्य
ऑफिस असिस्टंट -१ — कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक
कार ड्रायव्हर - १ — अनुभव असल्यास प्राधान्य
घरकाम करणारी महिला- १ — सर्व घरकाम
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888

**पाहिजेत** सह्याद्री ॲग्रोव्हेट कंपनीसाठी
मशीन ऑपरेटर/ हेल्पर नेमणे आहे
वेतन - २०,००० ते २५,०००
शिक्षणाची अट नाही
२ वेळा अल्पोपहाराची सोय
PF आणि ESIC सुविधांसह
पत्ता- प्लॉट नं. ४२, औद्योगिक वसाहत, पाण्याच्या टाकी जवळ, संगमनेर, एम.आय.डी.सी.
संपर्क - 8484046463, 9527426464

**पाहिजेत**
अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424

**पाहिजेत**
हॉटेल दौलत रिफ्रेशमेंट घारगाव करिता पाहिजेत
अकौंटंट - १
कॅशियर - ४
स्टोअर किपर - २
9665022661
8329104856

**सुभाष मनाजी शहाणे ज्वेलर्सकरिता पाहिजेत**
सेल्स पर्सन - १० पदे
१ ते २ वर्षांचा ज्वेलरी/रिटेल क्षेत्रातील अनुभव
शिक्षण - १२ वी उत्तीर्ण
8237510210
9890499699

**ड्रायव्हर पाहिजे**
घरगुती ऑटोमॅटिक गाडीवर निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
8668269897

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०१
ॲडव्हान्स एक्सेलचे ज्ञान आवश्यक
अकाउंटंट - ०१
टॅलीचे ज्ञान आवश्यक
किमान ०१ वर्षाचा अनुभव
आकर्षक पगार
बालाजी एअर प्रोडक्ट, संगमनेर
8600828485
9511833320

**ड्रायव्हर पाहिजे**
साईकृपा एंटरप्राईजेस
पिकअप/छोटा हत्ती (लोकल वाहतुक) गाडी चालवण्यासाठी ड्रायव्हर पाहिजे
पत्ता- मालपाणी मल्टिप्लेक्स समोर, संगमनेर
9767059977

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

**अभय ट्रेडिंग कंपनी करिता त्वरीत पाहिजे**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०२
सेल्समन - ०२
ड्रायव्हर - ०२
दुकान काम व शोरुमसाठी - ०२ जागा
महिला कामगार - ०२
9822097904


दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# धांदरफळ बुद्रुक येथे सामाजिक उपक्रमातून उद्योजक बाळासाहेब देशमाने यांचा वाढदिवस साजरा



**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–** तालुक्यातील धांदरफळ बुद्रुक येथील भूमिपुत्र आणि प्रसिद्ध उद्योजक बाळासाहेब भास्करराव देशमाने यांचा वाढदिवस केवळ शुभेच्छांचा वर्षाव न ठरता सामाजिक उत्तरदायित्वाचा सोहळा ठरला. स्वदेश युवा प्रतिष्ठान, स्वदेश सामाजिक सेवाभावी संस्था आणि ग्रामपंचायत धांदरफळ बुद्रुक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विविध आरोग्य व प्रशासकीय शिबिरांनी या वाढदिवसाला अनोखी उंची प्राप्त करून दिली.

बाळासाहेब देशमाने हे नेहमीच ग्रामविकास आणि धार्मिक कार्यात अग्रेसर असतात. त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून यावर्षी 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' अंतर्गत अनेक उपक्रम राबवण्यात आले. 'असेल दृष्टी तर दिसेल सृष्टी' या मोहिमेअंतर्गत रोटरी आय केअर ट्रस्टच्या सहकार्याने ७५ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली. त्यापैकी ७ रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी रोटरी आय केअर हॉस्पिटलमध्ये मोफत उपचारांचे मार्गदर्शन व निवड करण्यात आली.

देशातील रक्ताचा तुटवडा लक्षात घेता, अर्पण रक्तपेढीच्या माध्यमातून तरुण युवकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून श्री. देशमाने यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. धांदरफळ आरोग्य उपकेंद्राच्या मदतीने जिल्हा परिषद शाळेतील १०४ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे व आरोग्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. संगमनेर येथील संग्राम निवास मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांना स्नेहभोजन व अन्नदान करून देशमाने यांनी आपली सामाजिक संवेदनशीलता जपली.

ग्रामप्रशासनाला आधुनिकतेची जोड देत यावेळी 'ई-रेशन कार्ड' आणि ग्रामपंचायत मालमत्तेची माहिती देणाऱ्या 'क्यूआर कोड' (क्यूआर कोड) उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यामुळे ग्रामस्थांना घरबसल्या पाणीपुरवठा कर पावती आणि शासकीय योजनांची माहिती मिळणे सोपे होणार आहे. तसेच, साई समर्थ सेवा केंद्राच्या माध्यमातून ५५ ग्रामस्थ व विद्यार्थ्यांच्या आधार कार्डमधील चुकांची दुरुस्ती करण्यात आली.

'हिंद दी चादर' उपक्रमांतर्गत श्री क्षेत्र रामेश्वर देवस्थान ते श्री क्षेत्र देहू येथे जाणाऱ्या बीज यात्रा पालखी सोहळ्यातील भाविकांनी सामाजिक एकता, बंधुता आणि सहिष्णुतेचा संदेश दिला. त्याचबरोबर स्वदेश उद्योग समूहातील समीर परदेशी, योगेश देशमुख, सतीश दुर्गुडे, गोपीनाथ नाईकवाडी, अमोल डेरे, सागर घोलप, अक्षय पानसरे, गंगाराम सातपुते, महेश देशमुख, रघु दिघे, निखिल सानप, निरंजन सातपुते, भारत घुले, अशोक सातपुते, सचिन पोकळे, नितेश जोशी, संकेत करंजेकर यांच्या वतीने जीवदया गोशाळेसाठी चारा वाटप करण्यात आले. यावेळी गोशाळेचे व्यवस्थापक राजेश दोशी यांनी सांगितले की, उन्हाळ्यात चारा-पाण्याच्या टंचाईच्या काळात स्वदेश परिवार नेहमीच आमच्या पाठीशी खंबीरपणे उभा असतो. तर स्वयंप्रेरित संस्थेचे अध्यक्ष संतोष पवार यांनी मूकबधिर विद्यार्थ्यांच्या भोजन व्यवस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, हा वाढदिवस म्हणजे माणुसकीचे दर्शन घडवणारा सोहळा असल्याचे म्हटले.

या कार्यक्रमाला स्वदेश युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष नवनाथ देशमाने, नवनाथ नाईकवाडी, मोहन देशमाने, सचिन देशमाने, अविनाश देशमुख, राजेश शिंदे, किरण वाकचौरे, रोहन बनकर, दत्ता कासार, रामेश्वर देवस्थानचे अध्यक्ष सुनील देशमुख, माजी सभापती अनिल देशमुख, तंटामुक्ती अध्यक्ष शिवाजी काळे, सरपंच सौ. उज्वला नवनाथ देशमाने, ग्रामविकास अधिकारी सुरेश मंडलिक आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. सुप्रिया तोरकडी, डॉ. गौरव देवळे, संदीप घुले, नितीन कढणे, सुजाता वाकचौरे व त्यांच्या टीमने या उपक्रमांच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले. वाढदिवसाच्या निमित्ताने राबवण्यात आलेल्या या 'लोकाभिमुख' उपक्रमांचे तालुक्यात सर्वत्र कौतुक होत आहे.

# दोन्ही निवडणुका बिनविरोध व्हाव्यात – डॉ. सुजय विखे



**अहिल्या नगर (युवावार्ता प्रतिनिधी)–** भाजप प्रदेश उपाध्यक्ष, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीबाबत माहिती देत मविआ आणि महायुतीकडे मोठी मागणी केली. या दोन्ही जागा बिनविरोध व्हाव्यात, यासाठी दोन्ही बाजूंनी सामंजस्याने भूमिका घ्यावी. आपण त्यासाठी सर्वोपरी सहकार्याची भूमिका घेऊ, असे विखे पाटील यांनी म्हटले आहे.

बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीची दहा ते १२ मार्चमध्ये घोषणा होईल, असे सुजय विखे पाटील यांनी सांगितले, सांगितले. बंगाल, तामिळनाडू, केरळ, पाँडिचेरी आणि आसाम या पाच राज्यांच्या निवडणुकांबरोबर महाराष्ट्रातील पोटनिवडणुका लागण्याची दाट शक्यता आहे. अहिल्यानगरच्या राहुरी विधानसभा मतदारसंघाचे भाजप आमदार शिवाजी कर्डिले यांच्या निधनानंतर तिथल्या जागेची जबाबदारी आमची आहे. राहुरीमधील उमेदवाराबाबत आपण भाष्य करण्याचा अधिकार नाही. तो राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे अधिकार आहे, असे सुजय विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

आमचा प्रामाणिकपणे प्रयत्न आहे की, शिवाजी कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले यांना तिथे संधी मिळावी. कार्यकर्त्यांची देखील तशी भावना आहे. कार्यकर्त्यांनी नेता म्हणून त्यांची भावना माझ्याकडे व्यक्त केली. माझा नेता मुख्यमंत्री आहे. आता इथल्या उमेदवाराचा चेंडू मुख्यमंत्र्यांच्या कोर्टात आहे, असे विखे पाटील यांनी सांगितले.

मुख्यमंत्री राहुरीतील जनभावनेचा आदर करतील आणि उमेदवाराला संधी देतील. आम्ही देखील निवडणुकीला समोरे जाण्यासाठी सज्ज आहोत. निवडणूक पूर्ण ताकदीने लढणार आहोत. महाराष्ट्रात दोन पोटनिवडणुका होत आहेत. राहुरीबरोबर बारामतीचा समावेश आहे. महाराष्ट्रातील दोन्ही आघाड्यांवर याबाबत चर्चा होईल. अनेक राजकीय घडामोडी घडतील, असे सांगताच राहुरी विधानसभेत महायुती, त्यात भाजपचाच आमदार होईल, असे विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

राहुरी आणि बारामतीमधील रिक्त झालेल्या जागांवर दिग्गज नेते होते. दोन्ही जागांवरील उमेदवारांचे मृत्यू दुर्दैवानं झाले. कर्डिले यांचे निधन अचानक झाले, तर अजितदादांचे अपघाती निधन हे दुर्भाग्यपूर्ण होते. त्यामुळे महाराष्ट्राने आदर्श घडवावा. दोन्ही विधानसभेत तडजोड करून, सकारात्मक्तेने बिनविरोध कराव्यात, अशी अपेक्षा विखे पाटील यांनी व्यक्त केली.

# निशिगंधा कानवडे 'सीए' उत्तीर्ण

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–** तालुक्यातील निमगाव पागा येथील निशिगंधा निवृत्ती कानवडे हिने सीए परीक्षेत यश संपादन करत गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. अत्यंत साधारण व शेतकरी कुटुंबातील पार्श्वभूमी असलेल्या निशिगंधाने जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या बळावर हे यश मिळवले आहे.

निशिगंधाचे वडील निवृत्ती कानवडे तसेच काका बाळासाहेब कानवडे हे दोघेही शेती व्यवसायाशी निगडित असून, प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी मुलीच्या शिक्षणासाठी भक्कम पाठबळ दिले. ग्रामीण भागातील मर्यादित साधन-सुविधांमध्ये शिक्षण घेत असताना निशिगंधाने सीएसारखी कठीण परीक्षा उत्तीर्ण करून कुटुंबाची व गावाची मान उंचावली आहे.

शेतकरी कुटुंबातील कन्येने गाठलेले हे यश ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. तिच्या या यशाबद्दल परिसरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अकोले येथे दिव्यांगांसाठी मोफत सहाय्यक साधनांचे तपासणी शिबिर

**अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)–** इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड (आयओसीएल) यांच्या सीएसआर योजनेअंतर्गत दिव्यांगजनांना मोफत सहाय्यक साधने व उपकरणे उपलब्ध करून देण्यासाठी भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (ॲलिमको) व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर दि. ८ मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत अगस्ती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अकोले (जि. अहिल्यानगर) येथे होणार आहे.

या शिबिरामध्ये व्हीलचेअर, कुबड्या, चालण्याच्या काठ्या, श्रवणयंत्र, ८० टक्के अस्थिव्यंग असलेल्या व्यक्तींसाठी बॅटरीवर चालणारी तीनचाकी सायकल, सेरेब्रल पाल्सी खुर्ची, अंध व्यक्तींसाठी ब्रेल किट, सुगम्य केन, स्मार्टफोन, एडीएल किट, रोलेटर्स, बॅटरी चलित व्हीलचेअर, टीएलएम किट इत्यादी सहाय्यक साधनांसाठी पात्र लाभार्थ्यांची तपासणी व नोंदणी करण्यात येणार आहे.

भारत सरकारच्या पात्रता निकष व मार्गदर्शक तत्त्वांनुसार लाभार्थ्यांची नोंदणी करून ३१ मार्च २०२६ पर्यंत अकोले येथे उपकरणांचे वितरण करण्यात येणार आहे.

या शिबिराचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी आधार कार्ड व रेशन कार्डची मूळ प्रत, तसेच एक छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे. तसेच पात्रतेनुसार संबंधित दिव्यांग व्यक्तीने यापूर्वी मागील तीन वर्षांत केंद्र शासनाच्या कोणत्याही योजनेतून सहाय्यक साधने घेतलेली नसावीत.

या शिबिराचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे अकोले तालुक्यातील दुर्गम व आदिवासी भागातील प्रत्येक दिव्यांग व्यक्तीपर्यंत आवश्यक सहाय्यक उपकरणे पोहोचवून त्यांचे जीवन अधिक सुलभ व सोयीस्कर बनवणे, असे प्रतिपादन डॉ. सुजय विखे पाटील, अध्यक्ष, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, यांनी केले आहे. याशिवाय या शिबिरादरम्यान विखे पाटील मेमोरियल, अहिल्यानगर येथील तज्ज्ञ डॉक्टरांकडून दिव्यांग बांधवांची आरोग्य तपासणी देखील करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली आहे. अकोले तालुक्यातील सर्व दिव्यांग बांधवांनी या मोफत तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.





मा. श्री. विक्रमराजे थोरात

उपसरपंच– पानोडी, संचालक – राजहंस दुध


# कृत्रिम बुद्धिमत्ता: मानवी समाजावर वाढणारा अदृश्य धोका

कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स - एआय) ही आजच्या युगातील सर्वात वेगाने विकसित होणारी आणि क्रांतिकारी तंत्रज्ञानातील एक शाखा आहे. मनुष्याच्या विचारक्षमतेची नक्कल करणारे अल्गोरिदम, मशीन लर्निंग, डीप लर्निंग, स्वयंचलित रोबोट्स, भाषांतर प्रणाली, औद्योगिक रोबोटिक्स, चेहरा ओळख तंत्र-हे सर्व मानवासारखे निर्णय घेणारे डिजिटल बुद्धिमान घटक बनवत आहेत. विज्ञान-तंत्रज्ञान तज्ञांच्या मते, एआय मानव समाजाला आर्थिक, वैद्यकीय, औद्योगिक क्षेत्रांमध्ये अद्भुत परिवर्तन देऊ शकते. परंतु त्याची दुसरी बाजू-बेरोजगारी, गोपनीयतेचा भंग, मानसिक ताण, सामाजिक ध्रुवीकरण, शक्तीचा केंद्रीकरण आणि युद्धातील स्वयंचलित शस्त्रे-ही चिंताजनक आहे. याच कारणास्तव अनेक समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञानतज्ज्ञ एआय ला दुधारी तलवार म्हणतात।

रोजगाराचे क्षितिज अंधूक: ऑटोमेशन विरुद्ध मॅनपॉवर - एआय चा सर्वात प्रभावी परिणाम जागतिक रोजगारावर आहे. उत्पादन क्षेत्रात औद्योगिक रोबोट्स, गुणवत्ता तपासणी प्रणाली, लॉजिस्टिक शेड्युलिंग, अकाउंटिंग सॉफ्टवेअर आणि ग्राहक सेवा चॅटबॉट्स वेगाने मानवी कामांची जागा घेत आहेत. एकेकाळी १०-२० व्यक्ती करायची कामे आता काही सॉफ्टवेअर किंवा रोबोटिक आर्म्स सहज करतात. विशेषतः कॉल सेंटर, बँकिंग, विमा, रिटेल ग्राहक सेवा, ट्रान्स्क्रिप्शन आणि डेटा-एन्ट्री या क्षेत्रांत मानवांची गरज लक्षणीय कमी झाली आहे. मशीन लर्निंग आणि एनएलपी आधारित व्हर्च्युअल असिस्टंट्स, ग्राहकांना उत्तर देतात, चौकशा नोंदवतात, तक्रारी सोडवतात, व्यवहार पूर्ण करतात, अशा प्रकारे कंपन्यांचे खर्च कमी करतात-पण हजारो कर्मचाऱ्यांचा रोजगार गमावतो। औद्योगिक यंत्रे २४७ काम करू शकतात, सुट्ट्या लागत नाहीत, पगार, विमा किंवा सामाजिक सुरक्षा देण्याची गरज नाही. त्यामुळे उद्योगपतींना एआय अत्यंत आकर्षक वाटते. परंतु या प्रक्रियेमुळे कमी कौशल्याच्या लाखो कामगारांचे भविष्य धोक्यात आले आहे. देशातील ग्रामीण-नगरी भागातील तरुण वर्ग कौशल्यवृद्धी न झाल्यास स्पर्धेत मागे पडतो. तंत्रज्ञानाच्या आघाडीवर राहण्यासाठी सतत नवीन कौशल्ये शिकावे लागतात, अन्यथा नोकरी टिकत नाही. एआय नोकऱ्या नष्ट करत नाही-ती जुनी नोकरीची रचना उखडून टाकते आणि नवीन, उच्च-तांत्रिक नोकऱ्या निर्माण करते. पण त्या नोकऱ्या फक्त उच्च कौशल्य असलेल्या व्यक्तींनाच मिळतात. त्यामुळे सामाजिक विषमता वाढते।

गोपनीयता-डेटा हे नवे चलन - एआय च्या शक्तीचा मूळ स्रोत वापरकर्त्यांचा डेटा आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स, ई-कॉमर्स, राईड-शेअरिंग ॲप्स, स्मार्टफोन, फिटनेस बँड-आपण करत असलेले प्रत्येक क्लिक, लोकेशन, आवाज, शोध, विश्लेषणासाठी साठवले जाते. हा डेटा केवळ आपला अनुभव सुधारण्यासाठी नाही, तर बाजारात चलन म्हणून विकला जातो. कंपन्या तुमच्या आवडीनिवडी, खरेदी पॅटर्न, राजकीय झुकाव, भावना, मानसिक आरोग्याच्या सूचनांवर आधारित मोहिमा चालवतात. एआय-चालित अल्गोरिदम तुमच्या मनावर प्रभाव टाकतात आणि तुम्ही काय पाहावे, काय विचारावे, कोणावर विश्वास ठेवावा हे ठरवतात। यामुळे लोकशाही प्रक्रियेवर धक्का बसू शकतो. सोशल प्लॅटफॉर्म्स कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून इको-चेंबर तयार करतात-तुम्हाला फक्त तुमच्या मताशी सुसंगत माहितीच दिसते. विरोधी बाजूचे मत, परिणाम, चर्चा-सगळे अदृश्य होते. परिणामी समाज ध्रुवीकरणाकडे झुकतो, एक पक्ष बरोबर आणि दुसरा चुकीचा म्हणून ओळखला जातो. भारतासारख्या विविधतेच्या देशात हा कल विशेषतः धोकादायक आहे।



मनुष्य विरुद्ध मशीन: मानसिक ताण आणि मानवी संबंध - एआय तंत्रज्ञानामुळे सुविधा वाढल्या असल्या तरी मानवी संबंधांची गुणवत्ता कमी झाल्याचे तज्ञ सांगतात. किशोरवयीन मुले सोशल मीडिया, गेमिंग, व्हर्च्युअल मित्रांमध्ये एवढी गुंततात की प्रत्यक्ष संवाद कमी होतो. लोकांना संवाद साधणारी व्यक्ती किंवा मार्गदर्शक म्हणून चॅटबॉट्स किंवा डिजिटल सहाय्यक अधिक आवडतात. कंपनी आपल्याला योग्य उत्तर देईल, शिक्षक एआय टूल देईल, डॉक्टर डिजिटल रिपोर्ट वाचेल-या प्रक्रियेत मानवी स्पर्श हरवतो। मानसोपचारतज्ज्ञांचे मत आहे की डिजिटल अवलंबित्वामुळे एकाकीपणा, चिंता आणि नैराश्य वाढते. अनेक तरुणांना स्वतःच्या निर्णयांवर विश्वास राहत नाही; एआय ने सांगितले तरच ते सुरक्षित वाटतात. विद्यार्थी अभ्यासात एआय वापरतात, नोकरदार प्रेझेंटेशन एआय कडून करून घेतात, कलाकार चित्रे जनरेटिव एआय ने तयार करतात. यामुळे सर्जनशीलता कमी होते, प्रयत्नांची किंमत कमी होते. शॉर्टकट संस्कृती निर्माण होते-जे दीर्घकालीन विकासासाठी अपायकारक आहे।

शिक्षणातील एआय: साधन की शॉर्टकट? - शिक्षणक्षेत्रात एआय चा प्रसार जलद आहे. एआय ट्यूटर ॲप्स विद्यार्थ्यांना सराव प्रश्न, विश्लेषण, निराकरण पद्धती देतात. परंतु शिक्षकांच्या मते, एआय जर उत्तर त्वरित उपलब्ध करून देत असेल, तर विद्यार्थी समस्येचा विचार करणं थांबवतात. त्यांच्या विश्लेषण क्षमतेवर आणि कल्पनाशक्तीवर परिणाम होतो. परीक्षांमध्ये एआय चा गैरवापर होत आहे-ऑनलाइन टेस्टमध्ये चीटिंग, थिसिसमध्ये कॉपी-पेस्ट विचार, ड्राफ्ट लेखन पूर्णपणे एआय कडून। फक्त विद्यार्थ्यांनाच नाही, शिक्षकांचेही प्रशिक्षण बदलत आहे. पूर्वी अभ्यासक्रम विकसित करताना शिक्षकांनी संशोधन करणे, संदर्भ तपासणे, चर्चा करणे आवश्यक होते. आता एआय ड्राफ्ट तयार करते. त्यामुळे शिक्षकांचे ज्ञान-गुंतवणूक कमी होते. विद्यापीठांना वाटते एआय हे वेगवान समाधान, पण ते विद्यार्थ्यांच्या दीर्घकालीन विकासाला बाधक आहे।

एआय आणि युद्ध: मशीन-नियंत्रित विनाश - एआय च्या सर्वात भीषण संभाव्यतेचे क्षेत्र म्हणजे लष्करी तंत्रज्ञान. स्वयंचलित ड्रोन, मानवरहित टँक, एआय-नियंत्रित क्षेपणास्त्रे-आज युद्धांमध्ये यांचा वापर होतो आहे. किलर रोबोट्स म्हणजे एआय आधारित अशी शस्त्रे जी मानवाच्या हस्तक्षेपाशिवाय लक्ष्यावर प्राणघातक हल्ला करू शकतात. कोण बरोबर? कोण शत्रू?-या निर्णयात एआय अल्गोरिदम चुकले तर निरपराध नागरिकांचा मृत्यू होऊ शकतो. तज्ज्ञ सांगतात की युद्धाचा वेग वाढला तर धोरणात्मक चुका ओळखणे अशक्य होते. मानवी विवेकबुद्धी युद्धातील नैतिकता जपते; एआय मात्र गणिती समीकरणावर निर्णय घेते। यात आणखी एक मुद्दा म्हणजे डेटा मॅनिप्युलेशन. जर शत्रूने विरोधी दलाचा एआय मॉडेल हॅक केला, तर संपूर्ण संरक्षण यंत्रणा चुकीचे निर्णय घेईल. जेव्हा युद्धात सेकंदाचा फरक लाखो जीव वाचवू किंवा नष्ट करू शकतो, तेव्हा एआय वर अवलंबून राहणे-हे भविष्यकालीन भयावह परिस्थितीचे चित्र आहे।

एआय बरोबर राहण्याचा मार्ग: नियमन आणि नैतिकता - एआय पूर्णपणे वाईट नाही. आरोग्य सेवा, औषध संशोधन, वाहतूक व्यवस्थापन, हवामान अंदाज, ऊर्जा बचत-या क्षेत्रांत एआय अत्यंत उपयुक्त ठरेल. कर्करोग निदानाचे अल्गोरिदम, आपत्ती पूर्वसूचना प्रणाली, रुग्णालयातील आयसीयू मॉनिटरिंग-एआय मानवाचे प्राण वाचवते. पण समाजाला त्याचा फायदा मिळवायचा असेल तर तंत्रज्ञानाचे कठोर नियमन आवश्यक आहे।

तज्ज्ञांच्या मते - गोपनीयता संरक्षण: वापरकर्त्यांचा डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी कठोर कायदे, नैतिक फ्रेमवर्क: एआय च्या निर्णयांमध्ये मानवी मूल्यांना महत्त्व, शिक्षण सुधारणा: विद्यार्थ्यांना एआय हे साधन म्हणून वापरायला शिकवणे, पर्याय म्हणून नाही, तंत्रज्ञान साक्षरता: नागरिकांना डिजिटल जाणीव, डेटा सुरक्षा, अल्गोरिदमिक पक्षपाताची माहिती देणे, मानवी नियंत्रण: लष्करी एआय वर पूर्ण मानवी निरीक्षण-स्वयंचलित किलिंग सिस्टम्सवर जागतिक बंदी।

डीपफेक तंत्रज्ञान: कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित डीपफेक तंत्रज्ञान मध्यमवर्गीय सामान्य नागरिकासाठी नवा आणि अतिशय धोकादायक सापळा बनत आहे. एखाद्या व्यक्तीचे सोशल मीडियावरील फोटो, व्हिडिओ, आवाज किंवा चेहऱ्याच्या हालचाली वापरून त्याची पूर्णतः खोटी पण अत्यंत विश्वासार्ह प्रतिमा तयार केली जाते; बनावट अश्लील व्हिडिओ, गुन्हेगारी आरोपांचे क्लिप्स, किंवा राजकीय वक्तव्ये यातून एका सामान्य माणसाची प्रतिष्ठा एका क्षणात मातीमोल केली जाऊ शकते. समाजात काय म्हणतील लोक? या मानसिकतेत वाढणारा ताण, कुटुंबातील अविश्वास, नोकरीतील संशय, शैक्षणिक संधींची बंदी-हे सर्व परिणाम बळी पडलेल्या व्यक्तीवर एकत्रितपणे ओढवतात; अनेकदा ब्लॅकमेलर पैसे, वैयक्तिक माहिती किंवा भावनिक दबाव वापरून त्या व्यक्तीला धमक्या देतात आणि मध्यमवर्गीय कुटुंबे प्रतिष्ठेच्या भीतीने शांत राहतात. पोलिस तक्रारी, सायबर सेल तपास आणि न्यायालयीन प्रक्रिया महिनोमहिने चालतात, तर डीपफेक तयार करणारे व्हीपीएन, अनामिक खाते आणि एन्क्रिप्शनच्या आड लपून जातात; त्यामुळे डिजिटल गुन्हा सिद्ध करणे अत्यंत कठीण होते. सर्वात गंभीर बाब म्हणजे, खरी व्यक्ती सत्य सिद्ध करेपर्यंत समाज आधीच खोट्या प्रतिमेवर विश्वास ठेवतो-आणि हीच डिजिटल युगातील नवी हिंसा मध्यमवर्गीय मनुष्याला सर्वाधिक उध्वस्त करते।

निष्कर्ष: मानवी समाजासाठी चेतावणी - एआय ही आपली निर्माण केलेली बुद्धिमत्ता आहे-शत्रू नाही, पण अनियंत्रित मित्रही नाही. तंत्रज्ञानाचा वेग मानवाच्या नैतिक, मानसिक आणि सामाजिक विकासापेक्षा फारच जास्त वाढला आहे. आज एआय आपल्या जीवनाचा भाग आहे: शाळा, उद्योग, वैद्यक, राजकारण, अर्थव्यवस्था. परंतु जर समाजाने मूल्यांचे रक्षण केले नाही, डेटा सुरक्षित केला नाही, शिक्षणात विचारशक्ती जपली नाही, आणि एआय ला नैतिक सीमांचे भान ठेवले नाही, तर भविष्यात मनुष्यच आपल्या निर्माण केलेल्या यंत्राच्या अधीन राहील. असा दिवस दूर नाही-तो दिवस आपण आज काय निर्णय घेतो यावर अवलंबून आहे।





डॉ. उमाकांत दिनकर बुतकर

PhD –CSE, Post doc USA

कॉम्पुटर विभाग


गुरु गोबिंद सिंग कॉलेज ऑफ इंजीनीरिंग अँड रिसर्च सेंटर ,नाशिक

पॅनल
देणे आहे




पॅनल
देणे आहे






# कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आमदार अमोल खताळ आक्रमक



**शेतकरी वाचला तरच शेती वाचेल आणि शेती वाचली तरच देश मजबूत राहील. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी माझा कायम लढा राहील, असा निर्धार व्यक्त करत त्यांनी शासनाला शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी संवेदनशील भूमिका घेण्याचे आवाहनही आमदार अमोल खताळ यांनी केले.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - मागील दोन वर्षांपासून सतत तोट्याच्या विळख्यात सापडलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा ज्वलंत प्रश्नावर आमदार अमोल खताळ यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अत्यंत तीव्रतेने मांडत सभागृहाचे लक्ष वेधले. वाढता उत्पादन खर्च आणि घसरते बाजारभाव यामुळे शेतकरी हवालदिल झाला असून, परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत असल्याचे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.

आमदार खताळ म्हणाले की, एकरी कांदा उत्पादनासाठी सुमारे १ लाख रुपयांहून अधिक खर्च होत असताना बाजारात केवळ ८ ते १० रुपये प्रति किलो दर मिळत आहे. एवढा प्रचंड खर्च करूनही उत्पादनातून साधा खर्चही वसूल होत नसल्याने शेतकऱ्यांच्या कष्टाचे मोल शून्य ठरत आहे. खत, बियाणे, मजुरी, औषधे, पाणी आणि वाहतूक या सर्व बाबींमध्ये वाढलेला खर्च लक्षात घेतला तर शेतकरी अक्षरशः कर्जाच्या खाईत ढकलला जात आहे, अशी गंभीर बाब आहे. प्रचंड मेहनत करूनही शेतकऱ्याच्या हातात काहीच राहत नाही, ही अत्यंत वेदनादायक बाब आहे. कांदा उत्पादक आज आर्थिक संकटाच्या कडेलोटावर उभा आहे. बदलते निर्यात धोरण, अचानक होणाऱ्या निर्यातबंदीचे निर्णय आणि बाजारातील अस्थिरता यामुळे शेतकऱ्यांचे नियोजन पूर्णपणे कोलमडल्याचेही त्यांनी नमूद केले. शासनाने तातडीने हस्तक्षेप करून कांद्याला हमीभाव जाहीर करावा, निर्यात धोरणात स्थैर्य आणावे तसेच कांदा उत्पादक शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत द्यावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली. केवळ आश्वासनांनी प्रश्न सुटणार नाही; ठोस आणि तात्काळ निर्णय घेणे गरजेचे आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले.

# संगमनेरात पाचशे किलो गोमांस जप्त

## एकावर गुन्हा दाखल


युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील भारतनगर येथे एका पत्र्याच्या वाड्यामध्ये संगमनेर शहर पोलिसांच्या पथकाने बुधवारी (दि.४) सकाळी सव्वासहा वाजता छापा टाकून १ लाख रुपये किमतीचे पाचशे किलो गोमांस जप्त केले आहे.

याबाबत शहर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांना भारतनगर येथे पत्र्याच्या वाड्यामध्ये गोवंश जनावरांची कत्तल होत असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानुसार त्यांनी रात्रगस्तीवर असलेल्या पथकाला कारवाईच्या सूचना दिल्या. पथकातील पोकॉ. विजय आगलावे, बाळासाहेब गाडेकर यांनी पोहेकॉ. महेंद्र सहाणे, रुतिक बेणके, विशाल कर्पे यांना मदतीला घेत सदर ठिकाणी छापा टाकला. तेव्हा वाड्यामध्ये शहीद गणी कुरेशी (रा. जमजम कॉलनी, संगमनेर) हा दिसला. मात्र, पोलीस आल्याचे पाहून अंधाराचा फायदा घेत पळून गेला. त्याचा पाठलाग केला परंतु तो मिळून आला नाही.

या ठिकाणावरुन पोलिसांनी एक लाख रुपये किमतीचे पाचशे किलो गोमांस जप्त केले आहे. याप्रकरणी पोकॉ. विजय आगलावे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शहीद कुरेशी याच्यावर शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास शहर पोलीस करत आहे.

काही दिवसांपूर्वी नगरपालिका व पोसील प्रशासनाने अवैध कत्तलखाने जमिनदोस्त केले होते. त्यामुळे आता शहरात गोहत्या किंवा गोवंश जनावरांची कत्तल होणार नाही असे वाटत असतांना पुन्हा एकदा कारवाई करत गोमांस जप्त केले.




# नबाजी रभाजी गुंजाळ यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी):

संगमनेर - सहकार चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते तथा खांडगाव येथील रहिवासी कै. नबाजी रभाजी गुंजाळ यांचे वयाच्या ८९ व्या वर्षी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने खांडगाव परिसरात शोककळा पसरली आहे.


कै. गुंजाळ यांनी सहकार क्षेत्रात अनेक वर्षे कार्य करत सामाजिक बांधिलकी जपली. त्यांच्या पश्चात दोन मुले, चार मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पत्नी सौ. राधाबाई नबाजी गुंजाळ या सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात कारखान्याच्या माजी संचालिका म्हणून कार्यरत होत्या.

त्यांचे चिरंजीव सोमनाथ नबाजी गुंजाळ हे 'शाम्प्रो'चे संचालक असून खांडगाव ग्रामपंचायत समितीचे विद्यमान सदस्य आहेत. मोठे जावई भागवत दिघे हे गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर आहेत, तर दुसरे जावई जनार्दन आहेर हे माजी जिल्हा परिषद सदस्य आहेत. कै. नबाजी गुंजाळ यांचा अंत्यविधी खांडगाव येथील प्रवरा नदी बायपास पुलाजवळ शोकाकुल वातावरणात पार पडला. यावेळी सहकार, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांसह विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या निधनाने सहकार क्षेत्रातील एक ज्येष्ठ व अनुभवी कार्यकर्ते हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.



















दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25